# पद भाग क्र.५

१२ :– भ्रम बिंधुसन को अंग
१३ :– बिनती को अंग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|

पद भाग क्र.५

१२ :– भ्रम बिंधुसन को अंग

१३ :– बिनती को अंग

१२ :– भ्रम बिंधुसन को अंग


| | | |
|---|---|---|
| १ | दुनिया भ्रम माय भुलाणी  ११६ | १ |
| २ | जगत अचाई मित की रे १६१ | १ |
| ३ | जे आ मुगत भेष सु पावे १६९ | ३ |
| ४ | जिण मुख राम कहोरी रसना १७५ | ४ |
| ५ | जोगिया सत्त सबद ले भेवा १८० | ५ |
| ६ | जुग मे सोई जन ऊतरे पार १८६ | ७ |
| ७ | जुग मे अेक भ्रम हे भारी १८८ | ८ |
| ८ | केवळ राम रटो मन मेरा २०० | ९ |
| ९ | मै तो अेक सबद सत्त लिया २१५ | १० |
| १० | में तुज बूझुँ ढुँढ्यिां २१७ | १२ |
| ११ | पांडे अंत काळ काहाँ जावो २५८ | १४ |
| १२ | पांडे अेक सबद सत्त लीजे २६१ | १४ |
| १३ | पांडे पाखंड काय चलावो २६६ | १६ |
| १४ | पांडे समज चेत हुय भाई २६७ | १७ |
| १५ | पांडे समज सिंवर हल साई २६८ | १८ |
| १६ | पांडे समज्या यूं तत्त धारे २७० | २० |
| १७ | पिंडता भूल दोनुं घर मांही २७७ | २१ |
| १८ | पिया मै भूली हो २७८ | २२ |

| | | |
|---|---|---|
| १९ | साधो भाई भेद बिना जुग डोले ३११ | २३ |
| २० | साधो भाई राम भजन बिना झूठा ३१५ | २४ |
| २१ | साधो भाई तत कल लेहो बिचारी ३१८ | २६ |
| २२ | संतो भाई अे क्यूँ मोख न जावे ३४२ | २६ |
| २३ | संतो भाई अे क्युँ मोख न जावे ३५० | २८ |
| २४ | संतो ओ जग बडो अग्यानी ३६७ | ३० |
| २५ | संतो सत्त सबद सो न्यारा ३६९ | ३० |
| | १३ :– बिनती को अंग | |
| १ | अेसा भेव बतावजो १४ | ३२ |
| २ | गुरुजी कारज किस बिध कीजे १३४ | ३३ |
| ३ | जंतर मंतर अेक न जाणुं १६७ | ३४ |
| ४ | किरपा करो गुरु सिष कूं तारो २०२ | ३५ |
| ५ | कोहो इण मन सुं क्या करुं २०४ | ३६ |
| ६ | मै बहोत दुखी जुग माय २१२ | ३६ |
| ७ | मेरे मनकी दुबध्या मेटो प्रभुजी २३५ | ४१ |
| ८ | मोबल कर्म न जावे प्रभुजी २४३ | ४३ |
| ९ | प्रभुजी मै काहा कराँ इस मन को २८१ | ४७ |
| १० | प्रभुजी मेरे मन कूं हिम्मत दिजे २८२ | ४८ |
| ११ | प्रभुजी मेरी बाहाँ संभावो २८३ | ४९ |
| १२ | प्रभूजी मै किसका सरणाँ धारुं २८४ | ५० |
| १३ | समरथ मे तेरा सरणा लीया ३२७ | ५२ |
| १४ | सुणज्यो अर्ज हमारी प्रभुजी ३८६ | ५३ |
| १५ | तुम बिन आन ओर नहि धारुँ ४०४ | ५४ |

११६
|| पदराग सोरठ ||

दुनिया भ्रम माय भुलाणी

पूजे नक्कल असल की निंद्या || बोले मे ते बाणी ||टेर||

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ही सगळी दुनिया भ्रमात भुलली/विसरली आहे.सत्य काय आहे,हे समजत नाही आहे,म्हणून नकलची पूजा करीत आहे व असलची निंदा करीत आहे.||टेर||

सरप मांड पूजणे जावे || असल नाग कूं मारे ||
साचा साहेब घट मे बेठा || ध्यान पत्थर को धारे ||१||

ही दुनिया भिंतीवर साप बनवून पूजा करायला जाते,जेव्हा की तसाच असली(खरा) नाग निघाला,तर सर्व स्त्री–पुरुष एकत्र होऊन त्याला जीवानिशी मारतात.हे जग (दुनिया) खरा साहेब घटात बसला आहे,त्याचे ध्यान करीत नाही व दगडाची मूर्ती बनवून त्याच्यात ध्यान लावतात. ||१||

पितळ को नर सिंघ बणायो || सब पूजण कूं आवे ||
असल न्हार कूं देर नगारा || सब मारण कूं जावे ||२||

गाववाले पितळाचा नरसिंह बनवतात व त्याला(पूजा करायला)पूजायला जातात व खरा सिंह गावात आला,तरी सर्व गावातील लोकांना एकत्र करतात व त्याला पळता येत नाही असे बंदिस्त करुन जीवानिशी मारतात. ||२||

माटि की गिणगोर बणावे || पूजे लोक लुगाई ||
घट घट इसर गवर बिराजे || तां की खबर न काई ||३||

सर्व लोक(स्त्री पुरुष)मातीची गणगौर बनवतात व त्याची पूजा करतात व घटा घटात शंकर व गौरी राहतात त्याची खबर ही करीत नाही. ||३||

भग लिंग नकल जाय सींचे || असल जिणा की निंद्या ||
के सुखराम जक्त ओ पिंडत || झूट भ्रम सूं बिन्द्या ||४||

महादेव पार्वतीचे दगडाने बनलेल्या नकली(खोट्या)भग लिंगावर पाणी टाकून पूजा करतात. खरे लिंग व भग ने पुरुष स्त्री भोग करुन दुनिया बसवतात,त्याची दुनिया निंदा करते. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे दुनियेचे लोक व पंड्ति खोट्या भ्रमात अटकलेले आहेत. ||४||

१६१
|| पदराग धनाश्री ||

जगत अचाई मित की रे

जगत अचाई मित की रे || फेर फार नहि कोय ||
राम जग के मांय हे रे || जगत राम मे होय ||टेर||

जग खरे ही आहे व मृतक ही आहे.याच्यात काही फेरफार नाही.राम तीन लोक चौदा भवनात आहे व तीन लोक चौदा भवन रामात आहे.।।टेर।।

**माया हद तो अेक हे रे ।। न्यारो सुण्यो नहि कोय ।।**
**रूँख बीज के माँय हे रे ।। बीज रूँख में होय ।।१।।**

माया व हरी एक आहे,वेगळे कोठे ऐकले नाही.झाडात/वृक्षात बिज आहे व तेच बिज लावल्या(पेरल्या)नंतर झाड/वृक्ष उगते.असे बिजात झाड/वृक्ष आहे. ।।१।।

**जीमण अन तो अेक हे रे ।। नार पुरूष नहिं दोय ।।**
**जो जन जब ही समजिया रे ।। ज्याहाँ त्याहाँ हर ही होय ।।२।।**

भोजन(जेवण)व धान्य एक आहे.असेच स्त्री पुरुष एक जीव ब्रम्ह आहे,दोन नाही.जे जन जेव्हा एक समजेल,तर त्याला जेथे तेथे हरीच दिसेल. ।।२।।

**कूवो धरणी माँय हे रे ।। धरण कुवा मे होय ।।**
**ज्यूँ गडो जळ अेक हे रे ।। केबत कहिये दोय ।।३।।**

विहिर धरतीत आहे व धरती विहिरीत आहे.खड्डा केला तर धरती विहिर बनून जाते व तीच विहिर मातीने भरून दिली तर धरती बनून जाते असे विहिर धरती एक आहे. बर्फ व जल एक आहे.बर्फाला गरम केले तर पाणी होऊन जाते व पाण्याला थंड केले तर बर्फ होऊन जाते.असे जल(पाणी)व बर्फ एक आहे.।।३।।

**दोय कहुँ तो अेक हे रे ।। अेक कहुँ तो दोय ।।**
**दोय कहुँ ज्याँ बोहोत हे रे ।। गिणतन आवे हे कोय ।।४।।**

माया व ब्रम्ह असे दोन सांगतो,तर माया खूप आहे,मोजण्यात येत नाही व माया सर्व ब्रम्ह आहे सांगतो,तर सर्व मायेमध्ये एकच ब्रम्ह आहे,असे दिसते.।।४।।

**पाप केहुँ ज्याँ पुन हे रे ।। पुनं केंहु ज्याँ पाप ।।**
**बाप केहुँ ज्याँ पूत हे रे ।। पूत के हुँ ज्या बाप ।।५।।**

पाप फक्त पाप सांगतो.तर पाप हे कोरे पाप नाही आहे,त्याच्यात पुण्य आहे.असेच पुण्य सांगतो तर ते कोरे पुण्य नाही आहे,त्या पुण्यात काही पाप आहे,फक्त बाप सांगतो, तर फक्त बाप नाही आहे.त्याच्यापासून पुत्र जन्मतो म्हणून त्याच्यात पुत्र आहे व पुत्राला फक्त पुत्र सांगतो तर(म्हणतो तर)तो पुढे बाप बनतो.असा पुत्रामध्ये बाप आहे व बापात पुत्र आहे. ।।५।।

**जोग केहुँ ज्याँ भोग हे रे ।। भोग कहुँ ज्याहाँ जोग ।।**
**दुख केहुँ ज्याहाँ सुख हे रे ।। निरमळ केहुँ ज्याहाँ रोग ।।६।।**

जोगी सांगतो तर (म्हणतो) तेथे भोग आहे,ते इच्छा मायेचा भोग घेतात व फक्त भोग आहे असे सांगतो(म्हणतो),तर त्याच्यात शिल हा योग आहे.दु:ख म्हणतो तर पूर्ण दु:ख दिसत

नाही,जास्त दु:खी प्राणी दिसल्यावर सुख जाणवते व सुख सांगतो तर पूर्ण सुख नाही आहे,स्वत:पेक्षा जास्त सुखी दिसल्यावर दु:ख माहित पडते.निरोगी म्हणतो तर पूर्ण निरोगी नाही,घटात(शरीरात)कोठे ना कोठे रोग व रोगी म्हणतो.तर घटात कोठे ना कोठे निरोगी स्थिती आहे.।।६।।

**मोत केहुँ ज्याहाँ जनम हेरे ।। जनम जहाँ मर जाय ।।**

**अमी केहुँ ज्याहाँ बिष हे रे ।। बिष ज्याहाँ इमरत थाय ।।७।।**

मृत्यू म्हणतो तर पुढे जन्म दिसतो व जन्म म्हणतो म्हणजे जिवंत म्हणतो,तर पुढे मृत्यू दिसतो.असेच अमृत म्हणतो,तर तिथे विष आहे म्हणजे अमृत जास्त प्याल्याने विषाचा परिणाम देते व विष म्हणतो,तर त्याच्यात अमृत आहे त्याला कमी प्रमाणात (मात्रेत)घेतो तर ते औषध आहे.।।७।।

**ब्रम्ह ग्यानी नर अेक हे रे ।। बरते हे प्रगट दोय ।।**

**तीनुं चवदा लोक मे रे ।। जोडे बिनाँ नहि कोय ।।८।।**

जीव ब्रम्हज्ञानी व नर हे दोन्ही ही ब्रम्ह एक आहे परंतु रहेन सहेन(राहणीमान)वेगवेगळे आहे ब्रम्हज्ञानी मी ब्रम्ह आहे ही समज आहे परंतू नर जीव ब्रम्ह असून ही मी ब्रम्ह आहे म्हणून नाही समजत म्हणून ज्ञानाने राहनीमानात फरक आहे तीन लोक चौदा भवनात माया ही जोडीनेच आहे एक नाही जसे ऊन आहे तरी सावली आहे,श्रीमंत आहे तर गरीब आहे चतुर आहे तरी भोळा आहे असे जोडीने आहे परंतू सतस्वरुपात सर्व एक आहे.।।८।।

**दीसे सोई ब्रम्ह रूप हे रे ।। बोले सोई हर आप ।।**

**के सुखदेव भ्रम छाड दे रे ।। साच न केवळ जाप ।।९।।**

दिसतो तो ही जीव ब्रम्ह आहे व बोलतो तो ही हर आपण म्हणजेच जीवब्रम्हच आहे म्हणून जीव ब्रम्ह व माया हा भ्रम सोडून सर्व जीव ब्रम्ह आहे कोणी माया नाही आहे समजून जे सत्य निकेवल आहे त्याचा सर्वांनी जाप करावा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।९।।

१६९

।। पदराग कानडा ।।

**जे आ मुगत भेष सुं पावे**

**जे आ मुगत भेष सुं पावे ।। सबही मुगत काय नही जावे ।।टेर।।**

काळापासून मुक्ती प्राप्त करण्याची रीत वेश धारण केल्याने होते तर(झाली असती तर)आता पर्यंत जे जे वेश धारण करुन शरीर सोडून गेले त्यांची मुक्ती का नाही झाली. ।।टेर।।

**षट दर्सण सुं जे हर रीजे ।। घर का सकळ काय नही सीजे ।।१।।**

षट दर्शनांनी रामजी खुष झाले असते तर दर्शनांच्या घरातील जे लोक षटदर्शन बनून धामास गेले त्यांची मुक्ती का नाही झाली?ते मोक्षाला का नाही गेले? ।।१।।

**जोगी जंगम सेवडा सामी ।। घरमा फकर जगत सब कामी ।।२।।**

सर्व जोगी,जंगम,सेवडे,संन्यासी आणि फकीर हे सर्व संसाराचे समान काम विषयात बुडाले आहेत,मग यांची मुक्ति कशी होईल? ।।२।।

**अपना अपना धरम बतावे ।। षट दरसण भूला सब जावे ।।३।।**

हे षट दर्शन आपले आपले धर्म सांगतात या कारणाने रामजीला सर्व जग भुलून गेले आहे. ।।३।।

**सब का धरम अेक हे भाई ।। षट दरषण क्या लोक लुगाई ।।४।।**

षट दर्शन राहो किंवा स्त्री-पुरुष राहो या सर्वांचा एकच धर्म रामजी आहे.काही वेग वेगळा धर्म नाही आहे.कारण मुळात हे सर्व ब्राम्हण,क्षत्रीय,वैश्य आणि शुद्र याच्यांत एक अमर ब्रम्ह आहे,हे देहरुपी वेग वेगळी माया नाही आहे. ।।४।।

**के सुखराम बरण सब लोई ।। राम भजे डूबो नही कोई ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,चारी वर्णा मध्ये ज्यांनी ज्यांनी राम भजन केले ते कोणी पण आज दिवस पर्यंत बुडले नाही ते होणकाळाचा पुढे सतस्वरुपात गेले परंतु षटदर्शनी एक ही काळातुन मुक्त झाला नाही,हे षटदर्शनी जास्तीत जास्त स्वर्गादिक पर्यंत गेले.स्वर्गादिक होणकाळाचा तोंडात आहे,होणकाळाचा वर नाही आहे. ।।५।।

१७५

।। पदराग कल्याण ।।

**जिण मुख राम कहोरी रसना**

**जिण मुख राम कहोरी रसना ।। लारे कछू न रहो रे ।।टेर।।**

जो जीभेने रामनाम रटण करतो त्याला मोक्षफळ प्राप्त करण्याकरीता ब्रम्हा,महादेव, शक्ती,अवतार इत्यादींनी बनवलेली वेद,शास्त्र,पुराण,गीता यांच्या कोणत्या करण्या करणे बाकी राहत नाही रामनाम रटण्याच्या विधीत ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार इत्यादींनी सांगितलेले करण्यांचे फळ कुद्रती लागून जाते.।।टेर।।

**बेद भागवत साख भरत हे ।। सुखदेव काम दहो रे ।।१।।**

वेदात ब्रम्हाने,भागवतात कृष्णाने फक्त रामनाम रटल्याने मोक्षाने फळ कुद्रती लागून जाते ही साक्ष भरली आहे रामनामाने मोक्ष मिळतो म्हणून सुकदेवाने स्त्री ही माया त्यागली होती ना कामाचे दहन केले होते व रात्रं-दिवस रामनाम जपले होते.।।१।।

**सारद नारद संकर सक्ति ।। नित ऊठ से सहोरे ।।२।।**

शारदा,नारद,शंकर,शक्ती हे मोक्ष फळ प्राप्त करण्याकरीता नित्य(नेहमी)उठून राम नामाचे स्मरण करतात. ।।२।।

काग भुसण्डी गोरख हर ग्यानी ।। नेः ह्चळ होय रहो रे ।।३।।

कागभुसंडी,महादेवाचा भक्त गोरखनाथ हे सर्व ज्ञानींना सांगतात की,तुम्ही सर्व काळाचे तीन लोक चौदा भवन त्यागून काळाच्या पलीकडील निर्भय पद प्राप्त करा. ।।३।।

कह सुखराम सुणो सब ग्यानी ।। ऊँ निर्भे लोक गहो रे ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,तुम्ही सर्व काळाचे तीन लोक चौदा भवन त्यागून काळाच्या पलीकडील निर्भय पद प्राप्त करा. ।।४।।

१८०

।। पदराग सोरठ ।।

जोगिया सत्त सबद लो भेवा

जोगिया सतसबद लो भेवा ।। भजो देव सिर देवा ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याग करणारे त्यागी,सत राखणारे सत्ती,तप करणारे तपी,मौन ठेवणारे मौनी अशा सर्व प्रकारच्या योग्यांना सतशब्द जो सर्व देवांच्या शिरावरचा देव आहे त्याचा भेद घेवून भजन करा असे सांगितले.।।टेर।।

सुखदे सा केता जुग माही ।। जनमत छाड सब दीया ।।

जे या मुगत त्याग मे होती ।। जनक गुरू किऊँ कीया ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज योग्यांना समजवित आहे की सुखदेवासारखा जगामध्ये त्यागी कोन आहे?या सुखदेवाने जन्मल्याबरोबरच मोहरुपी माया त्यागली होती व वनाच्या रस्ता धारण केला होता.जर त्यागन केल्याने मुक्ती झाली असली.अशा सुखदेवाला गृहस्थीत रचमचलेल्या राजाला गुरु करण्याची गरज का पड्ली होती?याचाच अर्थ त्यागात मुक्ती नाही,मुक्ती सतशब्दामध्ये आहे.।।१।।

पाँडव पांच छटा नारायण ।। सरस साध जन क्काया ।।

जे या मुगत सत्त मे होती ।। बालमीत किऊँ लाया ।।२।।

राजसुय यज्ञ जेव्हा पंचायन शंख मनुष्याच्या मुखाने बिना फुंकल्याने आपोआपच कड्कडात वाजतो तेव्हा पूर्ण होतो ही पारख आहे.हा पंचायन शंख बंकनाळेने उलटून त्रिगुटीने मुक्तीत पोहचलेला सतशब्दी संत भोजन करतो तेव्हाच वाजतो.असा संत शरीराच्या वेशाने बाहेरुन ओळखला जात नाही याकारणाने अशा एकमात्र संताला ओळखून भोजनासाठी निमंत्रित नाही करता येत यासाठी राजसुय यज्ञ आयोजित करणारे राज्याचे सर्व साधू संतात असा कोणी साधू राहील या आशेने राज्याचे सर्व साधू संत तसेच जगाच्या लोकांना आदराने निमंत्रण देतात.असाच राजसुय यज्ञ द्वापार युगात राजा युधिष्ठिराच्या इथे आयोजित केला गेला होता.या राजसुय यज्ञात सर्व साधू संत तसेच युधिष्ठिर सह सर्व पांड्व व अवतार कृष्ण उपस्थित होते.युधिष्ठिर राजा सत्य बोलणारा व सत ठेवणारा साधू होता,त्याने आपल्या विरुध्दच्या युध्दामध्ये

शत्रू पक्षाचे शत्रू दुर्योधनाला आपल्या विरुध्द विजय प्राप्त करण्याचा उपाय दाखविला होता.दुर्योधन वज्र म्हणजे दगडासारखा बनून जाईल तेव्हा तो आमच्या पक्षाने कोणाच्याने ही मारला जाणार नाही असा उपाय दुर्योधनाला दिला होता.(तो उपाय असा होता की गांधारी आपला पती पुरुष सोडून कोणत्याही अन्य पुरुषाला नग्न अवस्थेत पाहून घेते तर तो ही मारला जात नाही.)असा हा सत्तमध्ये पराकमी राजा होता. राजसुय यज्ञात युधिष्ठरसह पाचही पांडव व सहाव्या कृष्णाने भोजन प्रसाद ग्रहण केला होता.असा प्रसाद केल्यानंतर ही पंचायन शंख वाजला नाही.जर मुक्ती सतमध्ये असती तर तो पंचायन शंख वाजला पाहिजे होता,शंख वाजला नाही या करीता मुक्ती प्राप्त केलेला श्वपच जातीच्या वाल्मीतला वनातून भोजनासाठी बोलवावे लागले.म्हणून मुक्ती सत ठेवण्यामध्ये नाही ती सतशब्दामध्ये आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२।।

**बन के ऋषी सकळ मिल सारा ।। उदियालख घर आया ।।**
**जे या मुगत तप से होती ।। नासकेत किऊँ बाया ।।३।।**

नासिकेतु यमपुरी पाहून आला.नासिकेतुला यमपुरीत आपले श्रेष्टतून श्रेष्ट तपी सर्व आजोबा,पणजोबा ऋषी यमपुरीत यमराजाच्या मुजरेमध्ये बसलेले दिसले.ही डोळ्याने पाहीलेली गोष्ट ऐकण्यासाठी उद्यालक पुत्र नासिकेतूच्या घरी वनातील सर्व लहान–मोठे ऋषी एकत्रित झाले.जर मुक्ती तपामध्ये असती तर यमपुरीत नासिकेतुला सर्व ऋषी यमाच्या मुजरेत बसलेले कां दिसले असते?याचाच अर्थ तपामध्ये मुक्ती नाही. मुक्ती सतशब्दात आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात. ।।३।।

**हस्तामल जनम नहि बोल्या ।। बरस दवादस तांई ।।**
**जे या मुगत मून मे होती ।। दत्त पास किऊँ जाई ।।४।।**

हस्तामल वयाच्या बारा वर्षापर्यंत कोणशीही एक शब्द बोलला नाही.जर मौन धारल्याने मुक्ती झाली असती तर हस्तामल दत्ताजवळ मुक्तीचा मार्ग विचारायला कां गेला? याचा अर्थ मौनमध्ये यमापासून मुक्ती नाही आहे.मुक्ती सतशब्दामध्ये आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।४।।

**बेद कुराण पुराण अठारे ।। सिध साधक की बाणी ।।**
**जन सुखराम भेद बिन लाध्या ।। सबे छाच अर पाणी ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की वेद,कुराण,अठरा पुराण,सिध्द तसेच मायाची सर्व साधूंची वाणी हे सर्व ताकाचे पाणी आहे.ताकातल्या पाण्यात जसे तूप नसते तसे सतशब्दाचा भेद वेद,कुराण,अठरा पुराण तसेच सिध्द साधूंच्या वाणीत नाही आहे.याकरीता सर्व योग्यांनी त्याग करने,सत ठेवणे,तप करणे,मौन पाळणे,वेद,

कुराण,पुराणच्या क्रिया करणी करणे व सिध्द साधूंची विधी धारण करणे सोडून सतशब्द ज्या साधूजवळ आहे त्यांच्या शरणात जावून सर्व देवांचा देव अशा सतशब्दाचा भेद मिळवला पाहिजे.।।५।।


१८६

।। पदराग केदारा ।।

**जुग मे सोई जन ऊतरे पार**

**ओर सकळ सब भाँड बिगवा ।। कियो भेष कूं खुवार ।।टेर।।**

जगात ज्या साधूंमध्ये सतस्वरुप ब्रम्हज्ञान उपजले आहे तेच साधू भवसागरातून पार उतरतील अन्य कोणते ही साधू भवसागरातून पार उतरणार नाही साधू ब्रम्हज्ञान प्राप्त करण्याकरीता कुळ संसार त्यागतात व शरीरावर वैरागी वेश धारण करतात परंतू वैराग्य सतस्वरुपची भक्ती करीत नाही उलट कुळाची म्हणजे इच्छा माता व पारब्रम्ह पित्याचीच भक्ती करतात अशाप्रकारे वैराग्य वेशाला धारण करुन खराबी करतात हा वेश धारण करुन वैराग्य सतस्वरुपाची भक्ती करणे हे साधूचे खोटे-खोटे सोंग म्हणजे ढोंग धारण करण्या सारखे आहे जे शरीरावर वेश धारण करुन साधू बनतात ते ढोंगी साधू आहेत त्यांच्यात सतस्वरुप ब्रम्हज्ञान प्रगटले नाही आहे.।।टेर।।




टिप-जसे पुत्र गृहस्थीपासून निघून वैरागी बनण्याकरीता भेदी गुरुच्याजवळ गेला वैरागीचा वेश धारण केला परंतू तेथे जावूनही वेद,व्याकरण न वाचता,ऐकता संसार केला म्हणजे मायेचेच काम केले.

**भगत सोई तन मन अरपे ।। जोगी निरदावे होय ।।**

**ओर भेष सब पेट भरणियाँ ।। जगत बिगाड़ी जोय ।।१।।**

ज्या भक्ताने रामजीच्या नावावर तन मन अर्पण केले आहे तेच भक्त पार उतरतील हे भक्त फक्त रामजीशी संबंध ठेवतात व जगाशी काही संबंध ठेवत नाही जे साधू पोट भरण्या करीता वेश परिधान करुन साधू बनतात ते ढोंगी साधू आहेत त्यांच्यात धन कमावून पोट भरण्याची शक्ती नाही आहे पत्नी,मुल पालन करण्याची ताकद नाही आहे म्हणून घरातून पळून पोट भरण्याकरीता साधू बनतात ढोंगी साधू ढोंग रचून जगाला पार उतरवण्यापासून भुलवून देतात असे जगातील लोकांचा अनमोल मनुष्य देहाचे कार्य बिघडून देतात. ।।१।।

**अड़द उड़द की डोर संभावे ।। चले पिछम की बाट ।।**

**बंक नाळ होय गढ पर चढियां ।। न्हावे त्रिगुटी घाट ।।२।।**

खरे साधू येत्या जात्या श्वासात रामनाम करतात व घटात उलटून पश्चिमच्या रस्त्याने म्हणजे बंकनाळच्या रस्त्याने त्रिगुटी गडावर चढतात व त्रिगुटीत गंगा,यमुना,सुषमना (सरस्वती)च्या संगमाच्या घाटावर न्हाहतात(स्नान करतात). ।।२।।

**सो जन गढ चड ध्यानज धरे ।। ऊपजे ब्रम्ह गिनान ।।**

**के सुखदेव सो जोगी बैरागी ।। ओर करम की खान ।।३।।**

असे संत जे गडावर चढून सतस्वरुप ब्रम्हचे ध्यान करतात त्यांना सतस्वरुप ब्रम्हचे ज्ञान कुद्रती उपजते आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे साधू जगात गृहस्थी आहे का वैरागी आहे हाच अस्सल विज्ञान योगी म्हणजे वैरागी आहे यांनी होणकाळ माया त्यागली आहे व सतस्वरुप विज्ञानाचा वेश धारण केला आहे हे साधू सोडून इतर सर्व साधू मायेच्या कर्मांची खाण आहे जीवांना काळात फसवणारी जमात आहे. ।।३।।

१८८

।। पदराग सोरठ ।।

**जुग मे अेक भ्रम हे भारी**

**ज्यां सूं सिष्ट सकळ पेदा व्हे ।। ब्रम्हा बिस्न सिव धारी ।।टेर।।**

संसारात एक भ्रम भारी आहे ज्या स्त्री पासून सर्व सृष्टी बनली तसेच ज्या स्त्रीस पत्नी करुन ब्रम्हा,विष्णू,महादेवाने धारण केली अशा स्त्रीला(माया)कर्म सांगतात हा संसारात भारी भ्रम आहे. ।।टेर।।

**कर्म गिणे सकळ सो बरते ।। छाने प्रगट सोई ।।**

**साहिब निमत उजागर होवे ।। दे नही सक्के कोई ।।१।।**

सर्व मनुष्य स्त्री संगाला कर्म समजतात परंतू कर्म समजणारे सर्व स्त्रीचा संग करतात कोणी प्रगट संग करतात तर कोणी लपून करतात साहेब निमित्त कोणी उजागर होऊन भक्ती करतात तर त्याला जगातील लोक स्त्री देत नाहीत. ।।१।।

**हिरा पन्ना मुंगिया देवे ।। अन्न जळ रस सब सारा ।।**

**सप्रस कूं कौ कान न मांडे ।। अेसा नेष्ट बिचारा ।।२।।**

अशा हरच्या भक्ताला हिरा देतात,पन्ना देतात,पोवळा देतात,अन्न जलाचे अनेक रस देतात परंतू स्पर्श करण्याकरीता स्त्री देण्यास कोणी ही कान देत नाही(ही गोष्ट ऐकण्यास ही कबूल करीत नाही)स्पर्श देण्याच्या गोष्टीला निच गोष्ट समजतात. ।।२।।

**के सुखराम जिकां हर चीन्यो ।। ज्यांरी दुबध्या भागे ।।**

**ओर सकळ तो सुर नर मूनि ।। लाय सकळ घर लागे ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याने हरला प्राप्त केले त्याची स्त्रीच्या चाहनेची दुबध्या(दुविधा)मिटून गेली परंतू इतर संसारातील सर्व मनुष्य,देवता,ऋषी मुनी मध्ये स्त्रीच्या चाहनेची आग लागून गेली आहे.।।३।।

२००

।। पदराग कल्याण ।।

केवळ राम रटो मन मेरा

ज्यूँ तेरा पाप करम कट जावे ।। मिटे जनम जुग फेरा ।।टेर।।

अरे मन,अरे जीव केवल रामाचे रटन कर,हा कैवल्य राम जीवाला चौऱ्यांशी लक्ष योनी मध्ये टाकणारे सर्व पाप कर्म कापून देतो.या कारणाने जीवाच्या मागे युगानयुगा पासून चौऱ्यांशी लक्ष योनींचा जो आवागमनाचा फेरा लागला आहे तो फेरा सहजमध्ये मिटून जातो.।।टेर।।

मन प्रतीत साच बिन आया ।। कारज सरे नही कोई ।।

कोट उपाव अनेक मनोरथ ।। कर देखो नर लोई ।।१।।

अरे मन कैवल्य रामावर पूर्ण विश्वास आल्याशिवाय हे पाप कर्म कापून आवागमनाचा फेरा मिटवण्याचे काम पूर्ण होत नाही.कैवल्य राम रटण्याच्या शिवाय कोटी उपाय व अनेक मनोरथ करुन पाहून घे त्याच्याने आवागमन मिटण्याचे काम कधी पूर्ण होत नाही. ।।१।।

तीरथ कोट धाम बिन लेखे ।। जिग निनाणुं कीया ।।

शिंवरण साच नाँव बिन लेहेसे ।। सुख रती नहि लीया ।।२।।

अरे मन,अरे जीव,कित्येकांनी कड्क नियम पाळून कोटी वेळेस अड्सष्टचे अड्सष्ट तिर्थ केले व करत आहेत.देवतांचे अवतारांचे धाम बिना हिशोबाने केले व करुन राहिले. नव्याण्णव म्हणजे अगणित यज्ञ केले व करत आहेत परंतु यांच्यातून कोणाला ही रतीभर ही सुख मिळाले नाही.अरे मन,अरे जीव या सर्वांनी कैवल्य रामावर विश्वास ठेवून कैवल्य रामाला रटले असते तर या सर्वांना सदासाठी परमसुख मिळाले असते. ।।२।।

जत सत्त त्याग तप हर किरिया ।। बरत वास कर रोजा ।।

सासा भजन साच बिन आया ।। तन मन किणी न खोज्या ।।३।।

अरे मन,अरे जीव जगामध्ये कित्येक जत ठेवतात,सत्त ठेवतात,तप करतात,त्याग करतात,व्रतवास करतात,रोजा करतात पण श्वासोश्वासात विश्वास ठेवून केवळ रामाचे भजन करुन तन मन कोणी शोधत नाही.या साधकांनी तन मन शोधले असते तर या सर्वांच्या तन,मनात केवळ राम प्रगट झाला असता व या सर्वांचे चौऱ्यांशी लक्ष योनीत टाकणारे सर्व पाप कर्म कटून जातील. ।।३।।

बाणी बेद च्यार कंठ कीया ।। अरथ करे बोहो भारी ।।

अेकण नाँव बिना पच थाका ।। गया जनम सो हारी ।।४।।

अरे मन,अरे जीव कित्येक साधकांनी चारही वेद व वेदांच्या आधाराच्या संतांच्या वाण्या

कंठस्थ केल्या व करुन राहिलेत वेद आणि संतांच्या वाण्यांचा कळी कळीचा भारी अर्थ ही केला व करुन राहिले.याप्रकारे पचून पचून थकून गेले तसेच थकून राहिले व आपला मनुष्य जन्म हारुन गेले किंवा हारुन राहिले.हेच साधक चारही वेद व संतांची वाणी कंठस्थ करण्यात व अर्थ करण्यात न पचता एक कैवल्य रामाची विधी साधली असती तर मनुष्य तनाचा जन्म जिंकून गेले असते.।।४।।

**तीरथ धाम ग्यान सब सारा ।। नाँव सांच कूं कीया ।।**
**के सुखराम भटक पच समझो ।। भावे घर मांहि जीया ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री,पुरुषांना सांगतात की हे सर्व तिर्थ,धाम,यज्ञ,जत,सत,तप,क्रिया,व्रतवास,रोजे,वेदाचे ज्ञान केवल नामावर विश्वास आणण्या साठी केले आहे म्हणून सर्व स्त्री,पुरुषांनो तिर्थ तसेच धामांत भटकल्या नंतर व जप,तप,त्याग,तपात पचल्यानंतर केवल राम रटण्याचे समजा किंवा या विध्यांमध्ये न पचता आजच समजून घरातच बसून केवल राम रटा. ।।५।।

२१५

(प्रस्तावना)

आज आपण आदि सतगुरु सुखरामजी महाराज यांचे जे भ्रम बिंधुसनचे पद आहे.
मै तो एक सबद सत्त लिया – हे घेणार आहोत.
या पदात आदि सतगुरु सुखरामजी महाराज काय सांगतात हे आपण पाहू.
१)परापरीपासून दोन पद आहेत.सतस्वरुप पद–जो कुद्रती अनंत महासुखांचा भरलेला आहे.जीवाला जे जे सुख पाहिजे–अनंत सुख,तृप्त सुख,फुकटात मिळणारे सुख, आज्ञाकारी सुख हे सर्व सुख पुरविणारा देश आहे आणि ते कुद्रती आहे म्हणजे आधी पासून हे सर्व सुख उपलब्ध आहे फक्त तिथे जाण्याची गरज आहे.
जसे–काश्मिरमध्ये कुद्रती ठंडाव्याचे सुख उपलब्ध आहे त्याकरीता आम्हाला काहीही करावे लागत नाही असेच या देशामध्ये बिना काही केल्याने कुद्रती सुख उपलब्ध आहे.
२)होणकाळ पारब्रम्ह–१)पारब्रम्हचा देश–ज्यात जीवाला कुद्रती सुख दु:ख दोघे मिळत नाही.
२) मायापद–ज्यात कृत्रिम सुख आणि सोबत काळाचे दु:ख मिळतात.या माया पदात कित्येक लोक सिध्द बनून महासुखी बनून गेले असे समजतात तर कित्येक बळवान बनून दु:खातून मुक्ती प्राप्त करुन घेतली समजतात या व्यतिरिक्त वेद,भेद,पुराण, शास्त्रच्या विध्या साधून परममुक्ती देणारा देश प्राप्त करुन घेतला असे समजतात.
अशा लोकांचे हे जे भ्रम आहे त्यांचा गुरु महाराज विध्वंस करतात म्हणजे मिटवतात.
कसेही बोलून भ्रम मिटवले का?तर नाही ज्ञानाने त्यांचे भ्रम मिटवले भ्रम मिटवण्याच्या

मागे गुरु महाराज चाहतात काय तर यांचे सर्व भ्रम मिटावे आणि सतस्वरुपाला जीवांनी धारण करुन महासुख लुटावे या कारणाने गुरु महाराजांनी भ्रमावर भ्रम बिंधुसनचा अंगच लिहिलेला आहे.तर पाहू की गुरु महाराज या पदात कोणाचे कसे भ्रम कापतात.

|| पदराग कानडा ||

**मै तो अेक सबद सत्त लिया**

**मै तो अेक सबद सत्त लिया || साझन आन छाड़ सब दीया ||टेर||**

मी फक्त एक सतशब्द धारण केलेला आहे दुसऱ्या ब्रम्हा,विष्णु,महादेव या त्रिगुणी मायेच्या सर्व साधना त्यागून दिल्या आहेत. ||टेर||

**जे आ मुगत बेद पढ होवे || ब्रम्हा ध्यान करे क्या जोवे ||१||**

जर ही सतस्वरुप मुक्ती वेद वाचून तसेच त्यातील जप,क्रिया करुन झाली असती तर वेदाचा ब्रम्हा सतशब्दांचे ध्यान का करतो ? ||१||

**जे आ मुगत सिध के मांही || दाणुं भूत अगत क्यूँ जाई ||२||**

जर ही सतस्वरुपाची मुक्ती सिध्द बनून सिध्दाई प्राप्त केल्याने झाली असती तर राक्षस,भूत हे अगतीत का राहिले असते?राक्षसात पूर्ण सिध्दाई राहते कुद्रतीच राहते व भूतात चौथाई सिध्दाई कुद्रतीच राहते मग ते अगतीत दु:ख भोगते का पडलेले आहे?||२||

**करामात सुं जे गत पावे || मिनखा देहि देव क्यूँ चावे ||३||**

जर करामातने परमपदाची गती प्राप्त केली असती/मिळाली असती तर ब्रम्हा,विष्णु, महादेव इ.सर्व देवता मनुष्य देहाची चाहणा का करत असते?त्यांच्याजवळ पर्चे चमत्कार करण्याची अनेक प्रकारची करामात आहे.ते जाणतात की सतशब्दाविना परमगती होत नाही.परमगती फक्त सतशब्दाने होते व तो सतशब्द मनुष्य देहाशिवाय प्रगट होत नाही म्हणून मनुष्य देहाची वंछना करतात. ||३||

**जे आ मुगत बोहोत बळ सारे || सेंसनाग क्युँ राम उचारे ||४||**

जर परममुक्ती खूप बळाने झाली असती तर शेषनाग परमगती करीता दोन हजार जीभेने रामनामाचे उच्चारन का करतो?त्याच्यात तर बळ पन्नास कोटी योजन पृथ्वी आपल्या शिरावर कोणत्याही कष्टा विना सहज धारण करण्याचे आहे मग त्याला परमगती प्राप्त करण्याकरीता रामनाम स्मरण का करावे लागत आहे? ||४||

**केहे सुखराम परमपद न्यारा || सतगुरू के संग लेह बिचारा ||५||**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले,परमपद प्राप्त करण्याची विधी वेगळी(न्यारी) आहे.ती विधी वेद वाचण्यात,सिध्द बनण्यात,करामाती देवता बनण्यात किंवा शेषनागा सारखे बलधारी बनण्यात मिळत नाही ती विधी सतगुरुचा शरणा घेतल्याने मिळते.|५|

२१७
।। पदराग ढाल ।।

**में तुज बूझुँ ढुँडियां**

**में तुज बूझुँ ढुँडियां ।। मूवा जळ किम होय ।।**
**भेद बतायर चालियो ।। गुरू की सोगन तोय ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना जैन साधू ने सांगीतले की,आम्ही जे जळ पित आहे ते जळ मृतक राहते म्हणजे जगाचा नर–नारीचा कामाचा नाही राहत.तेंव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराज जैन साधूला विचारतात की,जगाचा नर–नारीचा कामात नाही येत म्हणून जळ मरते,हे कसे होवू शकते?याचा भेद मला सांगा.जैन साधू जळ कसे मृतक होते तो भेद न सांगता क्रोध आणून जावू लागतो,तेंव्हा त्याला ज्ञानाने योग्य समजेल याकरीता त्याला त्याचा गुरुची शपथ देवून थांबवतात.तो पुढे ज्ञान चर्चा वाढ्वू. (राजस्थानात गुरुला फार महत्व राहते.गुरुची शपथ हे सर्वात मोठे अस्त्र राहते.)।।टेर।।

**पाप पुन्न बिन दोस सूं ।। किस बिध जीमे आण ।।**
**निकमो अन किम जायसी ।। सो मुज कहोनी बखाण ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना जैन साधू सांगतो,आम्ही जे अन्न खातो त्याचात पुण्य नाही राहत.हे अन्न ज्याचा घरात बनते आहे,त्याचा गरजेपेक्षा अधिक राहते,असा बेकार कोणाचा कामात न पड्णारे अन्न राहते.या वर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याला विचारले की,जीवाचा विना अन्न नाही बनत.तर तो स्वयंपाक पापाचा विना नाही बनला आणि स्वयंपाक बनविल्या बगैर मनुष्य जेवण नाही खावू शकत म्हणजे जेवणासाठी बनवलेला स्वयंपाक विना पापाचा नाही राहत.तो घरासाठी त्यांचा गरजेपेक्षा जास्त आहे परंतु तुम्ही सोड्न अन्य कोणी पण खाईल तर त्याची भुख मिटेल का राहील?जसे घराला सोड्न तेच भोजन दुसऱ्याचा क्षुधा शांतीचा कामात आले तसेच तुमचा कामात आले मग तेच अन्न निकम्मे कसे झाले?ते अन्न कोणाचाही कामात येवू शकते म्हणजे निकम्मे नाही झाले.परंतु निकम्मे नाही तर त्याचात जीव मरण्याचा पाप दोष नष्ट पण नाही झाला?मग ते अन्न जो खाईल त्याला हे पाप दोष लागेल ही लागेल याच्यात काही फरक नाही आहे.हे ज्ञानाने समजा.।।१।।

**तुं पीवे जिण नीर कूं ।। पावे बन कूं लाय ।।**
**वो फळ फूलां आवसी ।। कन वो निर्फळ जाय ।।२।।**

आम्ही मेलेले पानी म्हणजे कोणाचा कामात नाही येणारे पानी पितो,असे तुम्ही म्हणतात, परंतु तेच पानी मनुष्य जिवांना सोड्न झाड–झुडपाचा जीवांना दिले तर त्या झाड–झुडपाची तहान भागेल किंवा नाही?ते पानी पिल्याने झाडाला जिंवत झाडा सारखे फळ–फुल येतात का नाही?किंवा मेलेल्या झाडा सारखे फळ–फुल नाही येणार असे होईल का?

हे मला ज्ञानाने समजवून द्या.तर हे जळ झाड–झुड्पाचा पिण्याने त्यांना फळ–फूल येतात तर ते पानी निकम्मे कसे झाले?हे समजा.।।२।।

**तुज कूं देवे रोटियां ।। ज्याँ ने पुन कन पाप ।।**
**दोष कीसि बिध टाळिया ।। ओ अरथ कीजे आप ।।३।।**

तुला जे भाकरी देतात,असे भाकरी देणाऱ्याला पुण्य लागतात की पाप लागतात.जर पुण्य लागतात तर हे दुसऱ्याला म्हणजे कर्म तुमचावर दोषाचा रुपात उभा राहीला मग या कर्म दोषाला कसे निर्दोष कराल? याची समज तुम्ही करा आणि मला समजवा.।।३।।

**मुख सूं झाळा नास मे ।। बहे इधक करूर ।।**
**मुख रोक्या सूं क्या भयो ।। जीव तुं हते जरूर ।।४।।**

तुम्ही म्हणतात की,मुखाने बाष्प सोडल्या नंतर सुक्ष्म जीव मरतात.या करीता असे गरम बाष्पला रोकण्या साठी मुखाला बांधून घेतले आहे आणि तीच बाष्प नाकाने सोडली आहे.परंतु विज्ञान हे सांगते की नाकाने बाष्प निघते ती बाष्प मुखाचा बाष्पपेक्षा उष्ण राहते म्हणजे जी बाष्प नाकाने सोडतात त्या बाष्प ने पण जीव तो निश्चित ही जरुर मरतात.मग तोंडाला पट्टी बांधल्याने तुमचा देहाने जीवाचे मरने कोठे थांबले?हे मला समजवा.।।४।।

**वास किया सूं दोष रे ।। जे सुण उतरे जाय ।।**
**तो सिंघ जासी मोख ने ।। वो दिन तीसरे खाय ।।५।।**

तुम्ही म्हणतात की उपवास करण्याने जीव भवसागरातून पार उतरुन जातो.असे जर आहे तर ज्ञानाने समजा की सिंह कुद्रती ही दर तिसऱ्या दिवशी खातो,सहजात,बिना कष्टाने उपवास करतो,म्हणजे उपवासाने पार उतरले जाता येते तर सर्वात पहीले सिंह सहजात भवसागरातून पार होवून गेला असता परंतु तसे नाही होत तो पुढ्चा योनित पाप कर्म भोगण्याकरीता ८४,००,००० योनिचे एक शरीर धारण करतो.हे ज्ञानाने समजमध्ये आणा. ।।५।।

**अे प्रपंच सब छाड दे ।। सिंवरो सिरजण हार ।।**
**केहे सुखदेव सुण ढुँड्या ।। ज्युँ तुम उतरे पार ।।६।।**

हे सर्व गोष्टी ज्ञानाने समजा आणि मायात राहण्याचा हे सर्व प्रपंच सोडून द्या आणि तुम्हाला ज्याने घडविला अशा सिरजनहार केवलचे स्मरन करा.फक्त त्याचे स्मरन केल्याने ही तुम्ही भवसागरातून पार उतराल आणि कोणत्याही उपायाने पार नाही होणार. त्याचे स्मरन केल्याने नंतर कधी मायेत नाही जन्म घेणार आणि सदा करीता महानिर्वाण पदावर निश्चल राहणार.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जैन साधू(ढुँढ्याँ) ला ज्ञानाने विवीध प्रकाराने समजावले.।।६।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

२५८

।। पदराग सोरठ ।।

**पांडे अंत काळ काहाँ जावो**

**परण्या पीव छाड तुम दीया ।। अनवर आन मनावो ।।टेर।।**

अरे पंडित,तु अंतकाळी कोठे जाशील?तु ज्याच्याशी विवाह केला तो पती सोडून दिला व ज्याच्याशी विवाह झाला नाही त्याला पती समजून मानत आहे.।।टेर।।

**सुरगुण कथो बोत बिध मीठो ।। सत रूप बणावो ।।**

**बोहो आचार आँख मे अंजन ।। दुनियाँ ठग ठग खावो ।।१।।**

अरे पंडित,तू गोड बोलीमध्ये सगुण कथा बोलतो व कथा बोलतांना सुंदर दिसेल असे रुप बनवतो अनेक प्रकारचे आचरण करुन लोकांच्या डोळ्यात भ्रमाची धुळ फेकतो आहे जगाला लग्नाचा पती रामजी न सांगता विना लग्नाचे अन्य देवता भजण्याचे सांगतो आहे असे दुनियाला ठगवून ठगवून पोट भरतो.।।१।।

**जिण या देहे ज्यान सब कीवी ।। नख चख सरब बणाया ।।**

**तां को नाँव छिपावो बांभणा ।। आन यार बोहो गाया ।।२।।**

ज्याने हा तुझा देह व जगाला बनविले व तुझे नख चख सर्व बनविले अरे ब्राम्हण त्याचे नाव लपवितो आहे व भेरु भोपा या देवतांना भजण्यास शिकवतो आहे तरी तू अंतकाळी कोठे जाशील? ।।२।।

**तुम तो बुहा जात हो पांडे ।। दुनिया सरब बुहाई ।।**

**के सुखराम पीव कूं छाड़र ।। पतबरता कूण कवाई ।।३।।**

अरे पंडित,तू तर बुडत चालला आहे परंतु दुनियेला ही तुझ्या सोबत बुडवत आहे अरे पंडित पतीला त्यागून विना लग्नाच्या पुरुषाला मानणे अशा स्त्रीला पतिव्रता कोण म्हणेल? अरे पंडित,असेच रामजीला त्यागून भेरु भोपाला भजणे तर तुला अंतकाळात रामजी आपल्या घरी कसे घेऊन जाणार? ।।३।।

२६१

।। पदराग कानडा ।।

**पांडे एक सबद सत्त लीजे**

**पांडे एक सबद सत्त लीजे ।। बदले बेद भेद के दीजे ।।टेर।।**

अरे पंडित,तू सतशब्द फक्त धारण कर.सतशब्दाच्या बदल्यात हे वेद,भेद व वेद भेद सारखे ज्ञान,ध्यान,क्रिया कर्म सर्व त्यागून दे.।।टेर।।

**पीपे सुं हाजर हुय रेती ।। परसण हुय नित्त दरसण देती ।।१।।**

अरे पंडित,तू ज्या देवीची पूजा करतो आहे ती देवी पीपा समोर हाजर होऊन राहत होती प्रत्येक दिवशी पीपाला प्रसन्न होवून दर्शन देत होती हा पीपा आधी राजा होता नंतर तो ने:अक्षरी संत बनला(एका वेळी पीपाजवळ काही संत आले,तेव्हा पीपाने,त्या

संतांचा आदर सत्कार करुन त्या संतांना भोजन करण्यास सांगितले त्या संतांना सर्वात आधी भोजन करण्यास बसविले संत खाण्यास बसल्यानंतर घास घेतांना भोजनाची आज्ञा हवी असे ते संत आपल्या रीतीनुसार भोजन सुरु करण्यास आज्ञा हवी असे पीपाजीला बोलले तेव्हा मातेची आज्ञा ऐकून संतांना वाईट वाटले त्यांना असे वाईट वाटले की,आम्ही तर ब्रम्हचे भक्त आहोत(आणि अन्य देवांच्या व देवीच्या विरुध्द आहे)आणि याने मातेच्या नावाने,मातेला भोग लावा असे म्हटले हे देवीला भोग लावलेले अन्न आम्ही कसे खाणार?असा विचार करुन त्यांच्यातील एका संताने सांगितले की तुमच्या देवीला आम्ही लात मारतो आणि आज्ञा तर आपल्या नाथाची घेतो आणि स्वयंपाक डाळ भाताचा असे एका साधुने सांगितले.

’ देवी के मारु लात की,आज्ञा म्हारा नाथ की,रसोई दाल भात की ’

अशाप्रकारे बोलले आणि साधू भोजन करु लागले पीपाजीने स्वयंपाक चुरम्याचा बनविला होता परंतु संतांच्या म्हणण्याप्रमाणे चुरम्याचा डाळ भात होऊन गेला देवीचे भक्त बहुतेक विशेषत देवीला चुरम्याचा भोग(नैवेद्य)लावतात तसेच पीपाजीने ही चुरमा बनविला होता परंतू त्या चूरम्याचा डाळभात बनून गेला तो डाळ भाताचा भोग पीपाजी देवीकरीता मंदिरात घेऊन गेला तर मंदिरात बघतो तर काय देवीची कमर तुटलेली देवी पडली आहे पीपाजाने देवीला विचारले की,माताजी अशी का पडली आहे?देवीने सांगितले की,आज तुझ्या येथे आलेल्या संताने माझ्या कमरेवर लात मारली म्हणून माझी कमर तुटून गेली तु माझ्याकरीता जो नैवेद्य आणला आहे तो चुरमा नाही डाळ भात होवून गेला तेव्हा पीपाजी म्हणाला ते संत तुझ्या पेक्षा जबर आहे का?देवी बोलली हो ते माझ्यापेक्षा जबर आहे तेव्हा पीपाजी बोलले की मग आता मी तुझी सेवा करुन काय करु?असे देवीला सांगितले पीपाजी परत आला आणि संतांचे शिष्य बनून गेले.।।१।।

माता सेव मुगत जो पावे ।। पीपो छोड़ राम क्युँ ध्यावे ।।२।।

मातेची भक्ती केल्याने परममुक्ती मिळाली असती तर पीपा देवी मातेला सोडून रामनामाचे स्मरण का करतो.।।२।।

सिव सिव भज्या भरम भै भांजे ।। तो संकर ध्यान कोण को साजे ।।३।।

।।श्लोक।।

।। राम रामेति रामेती रमे रामे मनोरमे ।। सहस्त्रनामातत् तुल्यं रामनाम वरानने ।।

शिव शिव या नामाचे भजन केल्याने भ्रम नष्ट होतात व काळाची भिती पळते तर शंकर कोणाचे ध्यान करतो आहे?सतशब्दाचे करीत आहे का आणखी कोणाचे ध्यान करीत आहे. ।।३।।

सुरगुण सेव परम पद पावे ।। तो राम किसन क्यूँ ब्रम्ह ध्यावे ।।४।।

सर्गुण भक्तीने परमपद मिळाले असते तर सतोगुणी विष्णूचे अवतार रामचंद्र,कृष्णाने सतस्वरुप ब्रम्हाची का आराधना केली?||४||

**कह सुखराम सुणो सब कोई || ब्रम्ह बिना सब माया होई ||५||**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंड्ति व सर्व स्त्री–पुरुषांना बोलले की,एक सतब्रम्हच्या शिवाय दुसऱ्या सर्व वस्तु माया आहे,काळाच्या चारा आहे म्हणून अरे पंड्ति,तू सतशब्द फक्त धारण कर व अन्य सर्व मायेचे धर्म त्याग. ||५||

२६६

|| पदराग दीपचन्दी ||

**पांडे पाखंड काय चलावो ||**

**सत्त शव्द बिन मुक्त न व्हेली || कै बळ हुन्नर ल्यावो ||टेर||**

अरे पंड्ति,तु सतशब्दाच्या शिवाय अन्य विधीने परममुक्ती होते हा पाखंड,हे खोटे संसारात का पसरवितो?अरे पंड्ति,सतशब्दाशिवाय परममुक्ती होत नाही अन्य करण्यांचा हुन्नरचे कितीही बळ लावले तरी ही सतशब्दाशिवाय कोणाची मुक्ती होत नाही.||टेर||

**अेकी ब्रम्ह ओर नही कोई || तम दुबद्या बतलाई ||**

**मै बूजत हुं ग्यान बिचारी || भिन कहाँ सुं आई ||१||**

सतस्वरुप ब्रम्ह आदिपासून एकच आहे दुसरी आहे ती माया आहे सतस्वरुप ब्रम्ह नाही सतस्वरुप ब्रम्हने मोक्ष होतो मायेने मोक्ष होत नाही,तरी ही तु सतस्वरुप ब्रम्हच्या सारखा आहे मायेने ही मोक्ष होतो हा भ्रम जगात पसरविला हे पंड्ति मी सतज्ञानाने विचार करुन तुला विचारत आहे का सतस्वरुपापेक्षा भिन्न अशा मायेने परममुक्ती होते हे तुझ्यात ज्ञान कोठून आले? ||१||

**क्रिया करम करो बोहो भांती || चोका नित दिरावो ||**

**अन बिना भूक जो जावे || नाव बिना गत पावो ||२||**

स्वयंपाक घरात शुध्दतेचे आचार कर्म खूप पाळतात चौका नियमीत देतात फक्त हे करण्याने कोणाची भूक जात नाही भूक तर भोजन केल्याने जाते असेच चौसष्ठचे चौसष्ठ शुध्द लक्षण पाळतात परंतू नाम भजत नाही तर नामा शिवाय परमगती कशी होईल? ||२||

**कर सो बाड़ करे बोहो गाढी || खेत बीज बिन बावे ||**

**जे वो आण भरे घर कोठा || मोख नांव बिन जावे ||३||**

शेतकरी शेताच्या चारी बाजूला मजबूत कूंपण बनवितो शेत गवत,काडी कचऱ्यापासून साफ सुत्र करतो व शेतात बी टाकत नाही तर याच्याने त्या शेतकऱ्याचे धान्याचे पिक उगवत नाही व धान्य न उगवल्या कारणाने शेतकरी घरी व कोठ्यावर धान्य आणून भरु शकत नाही असेच घटात रामनाम उगविल्याशिवाय मोक्षाला जाता येत नाही.||३||

गेणो पेर सेज सिणगारे ।। साज सकळ बिध सारी ।।
नांव बिना किरिया सब करणी ।। पुरष बिना ज्यूँ नारी ।।४।।

कोणी स्त्री,दागिणे घालून सर्व श्रृंगार करुन करुन व पलंग चांगल्या प्रकारे सजवून पतिच्या शिवाय पलंगावर झोपली तर तिला जसे पतीचे सुख मिळत नाही तसेच नामा शिवाय मायेच्या सर्व करण्या आहेत याच्यात साहेब नसल्याकारणाने हंसाला साहेबाचे सुख मिळत नाही. ।।४।।

बिध आचार सकळ ले किरिया ।। देहे को रूप कहावे ।।
जन सुखराम जीव का संगी ।। नाँव सकळ रिष गावे ।।५।।

ह्या सर्व आचार क्रियेच्या विध्या देहाला सुखरुप बनविण्याच्या क्रिया आहे जीवाला सुखरुप बनविण्याच्या नाही आहे जीवाचा संगी फक्त निकेवल नाम आहे त्याच्याने जीवाला काळापासून मुक्ती मिळते असे सर्व ऋषीमुनी आपल्या आपल्या ज्ञानात गातात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५।।

२६७

।। पदराग कानडा ।।

पांडे समज चेत हुय भाई

पांडे समज चेत हुय भाई ।। सो सुण ब्रम्ह बाप बिन माई ।।टेर।।

अरे पंडित,मी सांगतो त्याला समज व समजून हुशार हो सतस्वरुप ब्रम्हला कोणी आई, वडिल नाहीत रामचंद्र,कृष्ण व ब्रम्हा,विष्णू,महादेवाला आई,वडिल आहेत म्हणून ब्रम्हा, विष्णू,महादेव हे जन्मलेली माया आहे हे सतस्वरुप ब्रम्ह नाही आहे. ।।टेर।।

तां के मात पिता कुळ सारा ।। सो सब माया रूप पसारा ।।१।।

रामचंद्र,कृष्ण इत्यादींना आमचा सारखे माता,पिता,कुळ आहे हे सर्व जन्मलेले आहे म्हणून हे सतस्वरुप ब्रम्ह नाही आहे हे आमच्या सारखी माया आहे रामचंद्रला दशरथ पिता व कौशल्या माता होती व कृष्णाला वासुदेव पिता व देवकी माता होती दोघांचा कुळ परिवार होता असे सतस्वरुप ब्रम्हला कोणी माता,पिता व कुळ परिवार नाही आहे.।।१।।

साखी :–साहेब सबका बाप हे ।। बेटा किसका नाय ।।
बेटा होकर औतरे ।। सोतो साहेब नाय ।।
असे दादु साहेबाने सांगितले आहे ती ,
साखी :–जन्मे मरे सो जीव हे ।। रमता राम न होय ।।
जन्म मरण से रहीत हे ।। मेरा साहेब सोय ।।
ना ओ जन्मे ना ओ मरे ।। ना आवे गर्भवास ।।
दादु उंधे मुख नही ।। नरककुंड नव मास ।।१।।

अंछया फूल अस्तरी ठाणो ।। तीनु जनम सगत मे जाणो ।।२।।

जगात जसे स्त्रीपासून पुत्र,पुत्री जन्मतात तसेच इच्छा म्हणजे शक्ती स्त्रीपासून ब्रम्हा, विष्णू,महादेव जन्मले आहे म्हणून ब्रम्हा,विष्णू,महादेव हे सतस्वरुप ब्रम्ह नाही आहे हे काळाच्या मुखातील माया आहे . ।।२।।

**तीनु जाग ऊपजे सोई ।। माया हे नहि ब्रम्ह बिचारो कोई ।।३।।**

हे तिन्ही ब्रम्हा,विष्णू,महादेव संसारात शक्ती मातेपासून उपजले म्हणून हे माया आहे हे सतस्वरुप ब्रम्ह आहे असा कोणी विचार करु नका. ।।३।।

**जळ बिन कीच धुपे नी कोई ।। सुरगुण सेव मोख नही होई ।।४।।**

पाण्या शिवाय गारा धुतला जात नाही अशाप्रकारे रजोगुणी ब्रम्हा,सतोगुणी विष्णू, तमोगुणी शंकर या मायेने मोक्षाला पोहचता येत नाही ही सगुण म्हणजे गुणांची भक्ती आहे त्रिगुणी मायेची भक्ती आहे ही सतस्वरुप ब्रम्हची भक्ती नाही आहे याकारणाने ब्रम्हा,विष्णू,महादेव यांच्यापासून कोणी मोक्षाला जात नाही.।।४।।

**पांड्या देव सगत ने जाया ।। दत्तब काज भुगत ने आया ।।५।।**

अरे पंडित,हे ब्रम्हा,विष्णू,महादेव यांना शक्तीने जन्म दिला हे आपल्या पूर्व संचितामूळे सर्व जगातील स्त्री पुरुषांसारखे कर्म भोगण्याकरीता जगात आले आहेत. ।।५।।

**दत्तब सारूं हे परकासा ।। दिपक चंद सूर की आसा ।।६।।**

हे ब्रम्हा,विष्णू,महादेव व सर्व स्त्री पुरुष आपल्या आपल्या पूर्व संचितच्या प्रमाणाने प्रकाशित कमी जास्त दिसतात जसे सूर्य,चंद्र व दिपकचा प्रकाश वेगवेगळा कुवतीचा कमी जास्त होतो असेच ब्रम्हा,विष्णू,महादेव व स्त्री पुरुषांच्या पराक्रमात फरक असतो. ।।६।।

**केहे सुखराम समझ रे पांडे ।। बिना ब्रम्ह माया के भांडे ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की अरे पंडित ब्रम्हा,विष्णू,महादेव,अवतार हे सर्व ब्रम्ह नाहीत हे मायेचे भांडे आहेत यांच्या सोबत मोक्ष होत नाही. ।।७।।

२६८

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**पांडे समज सिंवर हळ सांई**

**बिना भजन जुग परळे जावे ।। पडे. कूप भो माही ।।**

**निराकार निरधार सबद कूं ।। खोजो या तन मांही ।।टेर।।**

अरे पंडीत,तू समजून विना विलंब स्वामीचे स्मरण कर.रामभजन केल्या विना हे सारे जगत भवसागराच्या मोठ्या विहीरीत म्हणजे डोहात पडते.जो निराधार,निराकार शब्दाचा भेद घेतात तेच भवसागरात बुडण्यापासून वाचतात.जर तुला भवसागरात पडण्यापासून वाचायचे असेल तर राम स्मरण कर व घटात राम शोध. ।।टेर।।

**जे आ मुगत बेद मे होती ।। सुखदेव कहो क्युँ त्याग्या ।।**

ता कें घरे पुराण अठारे ।। फेर पढण की जाग्या ।।१।।

तू वेदांची शोभा करतो.जर या वेदांमध्ये परममुक्ती असती तर सुखदेव मुनी वेदांचा त्याग करुन वनांत कां गेला?सुखदेवच्या घरात तर वेद,अठरा पुराण सर्व होते व त्याच्या घरात वेद,पुराण शिकण्याची शाळा ही होती.सर्व मोठे मोठे ऋषीमुनी त्याच्या घरी वेद व्यासाजवळ वेद अध्ययन करण्याकरीता येत होते मग अशा वेद,पुराणाचे ज्ञानी घराचा त्याग करुन सुखदेव वनात कां गेला? ।।१।।

संक्राचारज आगली कैंता ।। पाछे सबे बताया ।।
जे आ मुगत बेद मे होती ।। दत्त पास क्युँ आया ।।२।।

जगाचे सर्व लोक,ज्ञानी,ध्यानी भूतकाळात घडलेली घटना सांगतात परंतु शंकराचार्य भविष्यात होणारी घटना सांगत होते.शंकराचार्य वैदिक ज्ञानात निपुण होते जर ही परम मुक्ती वेदात असती तर शंकराचार्य परममुक्ती प्राप्त करण्याकरीता दत्तात्रया जवळ कां गेला? ।।२।।

राज पाट सुख संपत माही ।। जे ओ मोख फळ पावे ।।
स्हेर उजीणी त्याग भरथरी ।। बनरोई क्युँ जावे ।।३।।

राजपाट,संपत्तीमध्ये मोक्ष फळ मिळते तर भरत राजा उजैन शहर त्यागुन वनात कां जातो? ।।३।।

करामात कर तूत सिधाई ।। जे यामे हर सूजे ।।
राम सरीसा को बळवंता ।। बासट कूं क्या बूजे ।।४।।

करामात,कर्तुत,सिध्दाई यात हर दिसला असता तर रामचंद्र करामात कर्तुत,सिध्दाईत बलवान होता.रावण तर तीन लोकात कोणाकडून मारला जात नव्हता.अशा रावणाला रामचंद्राने मारले मग असा बलवान रामचंद्र वशिष्ट मुनीजवळ काय विचारायला गेला? ।।४।।

जाजंळ रिषी बोत तप कीया ।। पवन गिगन चडाया ।।
जे आ मुगत जोग मे होती ।। तुळपे क्युं चल आया ।।५।।

जांजुळी(नरोत्तम)ऋषीने खूप तपस्या केली.त्याने आपला श्वास भृगुटीत चढवून अनेक युग समाधीत राहीले.समाधीच्या काळखंडात पक्ष्यांनी त्यांच्या जटेत घरटे करुन अंडे ठेवले होते.जर ही परममुक्ती योगाने झाली असती तर जांजुळी ऋषीची झाली असती मग जांजुळी ऋषी तुलाधारीच्या घरी परममुक्तीचा भेद विचारायला कां गेला ? ।।५।।

षट क्रिया आचार बिचार ।। जे यामे हर पावे ।।
व्यास सरीसा को कुण हूवा ।। नारद पे क्यूँ जावें ।।६।।

षटक्रिया म्हणजे नेती,धोती,कपाली,बस्ती वगैरे आचार विचार जर यात हर मिळाला

असता तर वेदव्यासा सारखा कोण झाला असता हे सांगा?मग वेद व्यास नारदाजवळ कशाकरीता गेला? ।।६।।

**त्याग जत्त कसणी बो कसिया ।। जे यामें पद सूजे ।।**
**लछमण सा जुग को कुण त्यागी ।। सीता कूं क्या बूजे ।।७।।**

त्यागन,जत्त म्हणजे ब्रम्हचर्य कसुन पाळल्याने परमपद सुजते तर लक्ष्मणासारखा संसारात कोण जती,त्यागी होता(लक्ष्मणाने चौदा वर्ष झोप घेतली नाही आणि काही खाल्ले नाही,चौदा वर्षापर्यत कोणत्याही स्त्रीचे मुख पाहीले नाही.स्वत: सीता बारा वर्षापर्यत सोबंत राहीली.तिच्या पायाच्या शिवाय जानकीचे मुख लक्ष्मणाने कधी पाहीले नाही आणि जमीनीवर पाठ लावून चौदा वर्षापर्यत झोपला नाही.)तर या लक्ष्मणसारखा या जगात कोण त्यागी आहे मग त्या लक्ष्मणाने सीतेला काय ज्ञान विचारले? ।।७।।

**जती त्याग क्रिया हर जोगी ।। बेद राज सुख सारा ।।**
**केहे सुखराम सुणो सब कोई ।। सत्त सबद हे न्यारा ।।८।।**

जती,त्यागी,क्रिया करणे,योग करणे,वेद पठण करणे,सुख घेत राजपाट करणे यांच्याने भवसागर पार होत नाही.भवसागर पार तर फक्त सतशब्दाने होतो म्हणून सतशब्द या सर्व करण्यांहून न्यारा आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।८।।

२७०

।। पदराग सोरठ ।।

**पांडे समज्या युं तत्त धारे**
**पाहेण सेवे जड हे माया ।। तां कूं दूर बिडारे ।।टेर।।**

अरे पंडित जे सतज्ञान समजतात ते तत्त धारण करतात जे दगडाच्या मूर्ति सारखी जड माया पूजतात त्यांना तत्तज्ञान समजले नाही म्हणून तत्तला दूर करतात.।।टेर।।

**अेक नार की नकल बणाई ।। अेक असल सो आवे ।।**
**अण समज के दोनु सरभर ।। समज्या सागे चावे ।।१।।**

एक अस्सल(खरी)स्त्री आहे व एक स्त्रीचा पुतळा आहे मुर्खाला दोन्ही सारखे दिसतात परंतु ज्याला स्त्रीचे सुख समजते तो खऱ्या स्त्रीला चाहतो तो पुतळ्याला कधीही चाहत नाही असेच ज्याला तत्तचे सुख समजते तो तत्तला चाहतो,दगडाच्या मूर्तिला चाहत नाही. ।।१।।

**कुवेकी अेक नकल बणाई ।। अेक असल सो किया ।।**
**पिणियाऱ्यां की भीड़ किसे पर ।। प्यासे कहाँ चित दीया ।।२।।**

एक जमीनीला खोदून बनवलेली खरी विहिर आहे व एक विहिरीचे चित्र आहे पाणी भरणाऱ्या स्त्रीयांची कोठे गर्दी राहिल व ज्याला तहान लागली आहे असा तहानेलेला कोठे चित्त देईल असेच अरे पंडित सतज्ञानाने समज तसेच चालता फिरता सतगुरु

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

पूज व दगडाची मूर्ति पूजणे त्याग(सोडून दे). ।।२।।

**गाबा घाल बणायो ओदर ।। अेक मास नव जावे ।।**
**के सुखराम ख्याल हे वां को ।। दूजी पूत्र खिलावे ।।३।।**

एक स्त्री आपल्या पोटावर नऊ महिन्याच्या गर्भवती स्त्रीसारखी गर्भवतीचा पेहराव घालते व एकीच्या पोटात नऊ महिन्याचा गर्भ आहे जी पोटावर गर्भवतीचा पेहराव घालते तिचा तो खेळ आहे तिच्या पोटात बालक नाही आहे याकारणाने ती बालकाला(बाळाला) खेळवू शकत नाही परंतू दूसऱ्या स्त्रीच्या पोटात खरे बाळ आहे ती बाळाला जन्म देईल व बाळाला खेळवेल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंडितला बोलले. ।।३।।

२७७

।। पदराग सोरठ ।।

**पिंडता भूल दोनु घर मांही**
**हिंदु तुरक जाय दोऊँ ऊजड़ ।। सतशब्द गम नाँही ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,अरे पंडीत,ही भूल दोन्ही घर(हिंदू व मुसलमान)या दोन्ही घरामध्ये भूल आहे.हिंदू व मुसलमान हे दोन्हीही ऊजड(बिना रस्त्याचा रस्त्याने) जाऊन राहिले आहे.(या दोघांनाही)या सतशब्दाची गम(माहिती) नाही. ।।टेर।।

**हिंदु बरतं तीरथाँ भरम्याँ ।। मुसलमान कर रोजा ।।**
**याँ थापी वाहाँ सरब उथापी ।। तन मन किणी न खोजा ।।१।।**

हिंदू व्रत(उपवास)व तीर्थ करुन भ्रमीत झाले आणि मुस्लिम रोजा करुन भ्रमीत झाले.(व्रत व रोजा या दोघांमध्ये उपवास करावा लागतो.)या हिंदू लोकांनी जे स्थापन केले त्या सर्वाची मुसलमान लोकांनी उलटून खंडण केले.परंतु शरीराची व मनाची कोणती(हिंदू व मुसलमान)दोघांनीही शोध केला नाही.।।१।।

**भेष बणाय हुवा षटदर्शण ।। पढ पढ पिंडत काजी ।।**
**सोन्नत कर कर हुवा तुरकिया ।। राम किसे सूं राजी ।।२।।**

(हे शरीरावर आपला आपला वेगवेगळा)भेष,बनवून सहा दर्शन(कानात मुद्रा घालून योगी बनले,गळ्यात लिंग बांधून जंगम बनले,डोक्यावरचे केस उपटून आणि तोंडावर पट्टी बांधून सेवडे बनले,यज्ञोपवीत तसेच शिखाचे हवन करुन संन्यासी बनले.सुन्नत करुन फकीर बनले.यज्ञोपवीत तसेच शिखा ठेऊन ब्राम्हण बनले.)असे हे वेगळे वेगळे भेष धारण करुन सहा दर्शनी बनले.खूप विद्या शिकून पंडीत झाले व इलम वाचून काजी बनले तसेच सुन्नत करुन तुर्क(मुसलमान)झाले.(तरीही या सर्वांच्या गोष्टींमधून राम कोणाच्या गोष्टीनी राजी(खुश) होतो. ।।२।।

**हिंदु पुरब दिसा कूं बंदे ।। तुरक पिछम कूं भाई ।।**

वे जाळे वे गड़े जमी मे ।। सत राह किण पाई ।।३।।

अशाप्रकारे हिंदू पूर्व दिशेकडे(तोंड करुन)वंदना करतात आणि तुर्क(यवन)पश्चिम दिशेकडे (तोंड करुन)नमाज पढतात.हिंदू आपल्या मुर्द्यांना जाळतात व मुसलमान आपल्या मुर्द्यांना जमिनीत गाडतात,तर या दोघांमध्ये खरा रस्ता कोणी प्राप्त केला आहे?।।३।।

हिंदु खरच बारवो थापे ।। तुरक चाळीसो खावे ।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। अरथ किसे को आवे ।।४।।

हिंदू मेल्यावर म्हणजे बाराव्या दिवशी त्याचे श्राध्द करुन लोक भोजन करतात आणि मुसलमान मेल्यावर,मुसलमान लोक त्याचा चाळीसाव्या दिवशी चाळीसा खातात.(साधु आणि सर्व वेषधारी मरणाऱ्याच्या नंतर सतराव्या दिवशी सतरावी खातात आणि सर्व वेषधारी मिळून खातात.)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानींनो ऐका.(हिंदूंनी आणि मुसलमानांनी यांनी जे जे केले ते कोणाच्या कामात आले.यांच्यात कोणाच्याही कामी आले असेल,तर ते सांगा.) ।।४।।

२७८

।। पदराग गुड ।।

पिया मै भूली हो ।।

मेरे सतगुरू ली सुळझाय ।। पिया मै भूली थी ।।टेर।।

हे मालिक,मी आपल्याला विसरुन गेली मला माझ्या गुरुने भ्रमाच्या जंजाळ्यातून काढून दिले तेव्हा मी आपल्यास माझ्या अंतर आत्म्यात प्राप्त केले. ।।टेर।।

सतगुरू भेव बताविया प्रभु ।। अंतर आतम राम ।।

भेद बिना बोहो भटकिया हो ।। पूज्या बायर धाम ।।१।।

हे प्रभू,माझ्या सतगुरुने आपल्यास प्राप्त करण्याचा भेद दिला तेव्हा मी माझ्या आतच हे आत्म्याचे राम आपणास मी प्राप्त केले आत्म्यातच परमात्मा आहे हा जोपर्यंत भेद नव्हता तो पर्यंत मी परमात्म्याला बाहेर खूप शोधले मी चारी धाम फिरलो,छत्री,चबूतरे पूजत आहे परंतू मला कोठे परमात्मा मिळाला नाही. ।।१।।

पत्थर बोहो बिध खोलिया प्रभू ।। लीया मुज उठाय ।।

समरथ सतगुरू बायरो प्रभू ।। सब जुग बूहो जाय ।।२।।

हे प्रभू,मी जागो जागी जाऊन दगडाच्या मूर्त्या धूतल्या व ते पाणी(जल)चरणामृत करुन (समजून)प्यालो परंतू मला घटात परमात्मा मिळाला नाही माझ्या सतगुरुने त्या भ्रमातून मला काढून माझ्या आतच आत्म्याचा राम परमात्मा प्रगट करुन दिला.।।२।।

बेद कतेब पारसी प्रभू ।। पढिये सुणये जोय ।।

दम तूटे ग्रह ठका प्रभू ।। मुगत कहाती होय ।।३।।

हे प्रभू,मी हिंदूचे वेद,मुसलमानांचे कुराण व फारशींचे ग्रंथ वाचले,ऐकले व पाहिले परंतू

आतमध्ये परमात्मा कधी मिळाला नाही गृहस्थीमध्ये श्वास कमी होतात तरी ही मुक्ती प्राप्त करण्याकरीता गृहस्थी बनून अनेक भक्त्या मी केल्या,गृहस्थी जीवनात माझे श्वास तुटले परंतु मुक्ती मिळाली नाही. ।।३।।

**तीरथ कूं बोहो भटकिये हो ।। पावे दुख अपार ।।**
**ज्हाँ जावे जळ पाण हे प्रभू ।। दूजो नहि बिचार ।।४।।**

हे प्रभू,मी तीर्थात खूप भटकलो तेथे अपार दुःख भोगले जेथे गेलो तेथे जल व दगडच दिसले,परंतू परमात्मा कोठे दिसला नाही.परमात्मा माझ्या सतगुरुने घटात आत्म्यातच दाखवला. ।।४।।

**बरत वास उपासणा प्रभू ।। आतम कसे अपार ।।**
**बाण बिना कबाण कूं प्रभू ।। क्या कस पाडण हार ।।५।।**

हे प्रभू,मी व्रतवास,उपवास पाची आत्म्यांना कष्ट देऊन देऊन खूप केले परंतू परमात्मा कोठेही मिळाला नाही जसे धनुष्य आहे परंतू बाण नाही आहे त्या धनुष्यास ताणून शत्रूला मारुन पाड्ता येत नाही असेच प्रभू प्राप्त करण्याचा भेद नाही व देहाला खूप कसले तर आत रमणारा परमात्मा मिळणार नाही. ।।५।।

**उळझे कूं सुळझावियो हो ।। सतगुरू समरथ आय ।।**
**सुखियाँ सांई पाविया हो ।। अंतर आतम मांय ।।६।।**

याप्रकारे मी सर्व भक्त्या,करण्या,धर्मात खूप अड्कलो होतो या अड्चणी तून माझ्या सतगुरुने मला काढले व ज्ञानाने समजावून घटातच परमात्मा आहे हे समजावले आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,समर्थ सतगुरुंच्या भेदाने साई मला आतच आत्म्यात प्राप्त झाले. ।।६।।

३११
।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई भेद बिना जुग डोले**
**सतगुरू बिनाँ भेद नहि सूजे ।। ता तेई मिथ्या बोले ।।टेर।।**

साधो भाई(संत बंधू)रामजी तारतात हा तिरण्याचा भेद जगाला माहित नाही म्हणून जग तीर्थ,वन,कथा इत्यादीत फिरतो हा रामजी तारतो हा भेद सतगुरुच्या शिवाय सुचत नाही(समजत नाही)म्हणून तीर्थात जाणे,वनात जाणे हे मोक्षाला जाण्याकरीता खोटे असल्या वरही खरे समजतात. ।।टेर।।

**तीरथ जाय समझ ज्याँहाँ लावे ।। सो घर में नर धारे ।।**
**रमता राम ज्याहाँ त्याहाँ पूरण ।। समज्या ज्याहाँ हर तारे ।।१।।**

जगातील लोक तीर्थात जाऊन रामजी तारतात हा समज घटात(शरीरात)आणतात हाच समज घरातच बसून-बसून आणत असते तर तिरण्यास वेळ लागला नसता रमता रामजी

जेथे–तेथे तारण्यास पूर्ण आहे जेथे त्याला समजून जाल तेथे तो तारुन देईल,मग तीर्थ व घराचे काही कारण राहणार नाही. ।।१।।

**अे घर छाड़ बना कूं जावे ।। बडे गुफा मे कोई ।।**
**वो सुण मत घर हि में लावे ।। तो तिरता बार न होई ।।२।।**

हे ज्ञानी ध्यानी घर त्यागून तिरण्याकरीता वनात जातात पहाडाच्या गुफेत ध्यान लावून बसतात तेथे जाऊन रामजी तारतात हे मत घटात(शरीरात)आणतात तेच मत घटात आणले असते तर घटात(शरीरात)तिरण्यास वेळ लागला नसता. ।।२।।

**ब्याक्रण साझ भागवत बाचे ।। अरथ करे जे भारी ।।**
**वाँ को मूळ पढे जे घट मे ।। देहत काळ कूं मारी ।।३।।**

व्याकरण शिकतात भागवत वाचतात व त्याचा भारी भारी अर्थ करतात त्या व्याकरण भागवतचे मूळ रामजी आहे हे घरातच घटात समजून घेतले असते तर देह थकला, काळाला मारुन भवसागर तिरण्यास वेळ लागला नसता. ।।३।।

**के सुखराम समझ को कारण ।। जाग ठाम को नाही ।।**
**ज्याँ सुण नाम साच घट आयो ।। तिरतां बार न कांही ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तिरण्याची समज यायला हवी तिरण्या करीता घर किंवा तीर्थ किंवा वन हे कोणते कारण नाही ज्याच्या घटात रामनाम हेच तारु शकते हा विश्वास होऊन जातो त्याला तिरण्यास वेळ लागत नाही. ।।४।।

३१५
।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई राम भजन बिना झूठा ।।**
**करणी सकळ नांव बिन असी ।। ज्यूँ कालर मेहे बूठा ।।टेर।।**

साधु भाऊ,राम भजन शिवाय मस्त मनात राहणे किंवा तन सुकविणे या करण्या नाव प्रगट करण्याकरीता खोट्या आहेत म्हणजे मोक्ष प्राप्त करण्याकरीता खोट्या आहेत.या सर्व करण्या बिन उपजाऊ जमिनीवर पाऊस पाडण्यासारख्या आहे.बिन उपजाऊ जमीनीवर कितीही पाऊस पाडला तरीही एक ही धान्याचे झाड उगत नाही.त्याच तऱ्हेने रामभजना शिवाय सर्व करण्या कितीही केल्या तरीही घटात ने:अक्षर नाव थोडेसेही प्रगट होत नाही. ।।टेर।।

**अे तो अेक अनेका जागा ।। गुरू गम बिन नही पावे ।।**
**आपो भूल भरम मे बंधिया ।। भटकत जनम गमावे ।।१।।**

हा मोक्ष देणारा कर्ता मायेच्या करण्यांसारखे अनेक नाही फक्त एक आहे.तरीही सर्व जागी ओतप्रोत व्यापक आहे.तो प्रत्येकाच्या घटात ओतप्रोत व्यापक आहे.असा घटात असल्या नंतरही गुरुच्या कृपेविना हा कर्ता मिळत नाही.जीवाला सत्तज्ञान न झाल्या

कारणाने जीवात मी ब्रम्ह आहे मी मन व पाच आत्मा ही माया नाही ही भुल पडते व मी मन व पाच आत्मा आहे हा भ्रम उपजतो.याकारणाने जीव मन व पाच आत्म्याच्या विषय वासनांच्या रसांकरीता ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती अवतार इ.त्रिगुणी मायेत भटकून आपला अनमोल मनुष्य देह गमवून देतो.।।१।।

**किस्तुरी मिरग बन ढूँढे ।। पाटू केहे कित तागो ।।**
**लेहेरी पूछे नीर कहाँ हे ।। ब्रछ केहे फळ लागो ।।२।।**

जसे मृगाच्या नाभीत कस्तुरी राहते परंतु समझ नसल्या कारणाने तो मृग कस्तुरी शोधण्यात वनात भटकतो तसेच कर्ता घटात आहे परंतु जीव त्याला तिर्थात,वनात शोधत फिरतो व आपला अनमोल मनुष्य देह गमवून देतो.पाटू म्हणजे कपडा कपड्यात धागा राहतो(परंतु कपडा धागा आहे हे विसरुन जातो व स्वतःमध्ये)धागा कुठे आहे, धागा कुठे आहे हे शोधत फिरतो.सागराच्या लाटांमध्ये पाणी असते परंतु लाटा पाणी कुठे आहे,पाणी कुठे आहे हे शोधत फिरतो.त्या लाटा हे समजत नाही की माझ्या लाटांमध्ये पाणी ओतप्रोत आहे.वृक्ष बीज कोठे असतील हे शोधतो.याचप्रकारे कर्ता घटात ओतप्रोत भरलेला आहे.परंतु साधु कर्त्याला वनात,करण्यांमध्ये शोधतात व आपला मनुष्य देह गमवून देतात. ।।२।।

**जे कोई नाँव नाँव ही कहिये ।। लिव लागा सूं पावे ।।**
**तन के बाहर कर्ता ढूँढे ।। सो सब भूला जावे ।।३।।**

जे जे ज्ञानी,ध्यानी मोक्ष प्राप्त करण्याकरीता नाव प्राप्त केले पाहीजे,नाव प्राप्त केले पाहीजे असे म्हणतात ते नाव रामभजनाची लीव लावल्याने घटातच प्राप्त होतो परंतु ज्ञानी,ध्यानी हे जाणत नाही म्हणून या नावाला म्हणजे कर्त्याला घटात न शोधता त्रिगुणी मायेच्या करण्यां मध्ये शोधतात अशा करण्यां मध्ये नाव शोधणारे सर्व साधु भ्रमात भुललेले आहे,बांधलेले आहे.ते करण्यांमध्ये कर्ता शोधण्यात अनमोल जन्म गमवून राहीले आहे.झाडाचे फळ आहे ते झाडातच असते.झाडामध्ये होते तेव्हाच ते झाडातून निघाले. झाडाला फळ बाहेरुन येउन लागले नाही तर झाडामध्ये फळ राहीले नसते तर कोठून आले असते.।।३।।

**काहा किणी मते मस्त मन कीयो ।। काहा किण तन सुकायो ।।**
**के सुखराम नाम बिन रटिया ।। किणी कछु नहि पायो ।।४।।**

मीच कर्ता आहे असे समजून कित्येक साधु मनातल्या मनात मस्त होऊन राहतात तर कित्येक साधू कर्ता करण्यांमध्ये आहे समजून करण्या करुन करुन तसेच तिर्थ करुन करुन शरीर सुकवून देतात परंतु रामनाम रटत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे मस्त मत करणारे किंवा तन सुखविणारे कोणालाही मोक्षात घेऊन

जाणारे नाव मिळत नाही.अनमोल शरीर असेच वृथा जाते.।।४।।

३१८

।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई तत्त कळ लेहो बिचारी**

**मत्त ग्यान सूं जे नर उधरे ।। तो उधरे मांड ज सारी ।।टेर।।**

संत बधूंनो तत्त कलेची विधी धारण करा तत्त ज्ञानाशिवाय आपल्या मत्त ज्ञानाने कोणाचाही उध्दार होत नाही उध्दार झाला असता तर पृथ्वीच्या सर्व मनुष्यांचा झाला असता सतज्ञानाने पाहिले तर पृथ्वीचे(पृथ्वीवरील)सर्व मनुष्य मत्तज्ञानी आहे तरी(तर) आजपर्यंत कोणाचाही मत्तज्ञानाने उध्दार का नाही झाला?म्हणून तू तत्तचा विचार धारण कर व मत्तज्ञानाच्या सर्व विध्या त्याग.।।टेर।।

**मत तो सरब भरम का धोरा ।। तां मे बीज न होई ।।**

**ज्युँ घूमर की घटा दिखावे ।। तां मे छांट न कोई ।।१।।**

मत्तज्ञान तर तत्तच्या शिवाय बिजाच्या भ्रमाचा भेरा आहे हे मत्तज्ञान धूरातून उत्पन्न झालेल्या ढगांसारखे आहे या ढगांमध्ये पाण्याचा एक थेंब ही राहत नाही तरी ही हे ढग भोळया लोकांना खऱ्या ढगांसारखे दिसतात अशाप्रकारे मत्तज्ञानात तत्तज्ञान राहत नाही तरी ही अज्ञानींना मत्तज्ञानात तत्तज्ञान दिसते.।।१।।

**जैसे नीर मृग जळ दीसे ।। यूँ तत्त बिनाँ सब करणी ।।**

**धरम पाप की बांध गाँठडियाँ ।। चोरासी लख फिरणी ।।२।।**

जसे हरणाला रेताळ जमीनीवर एक थेंब पाणी राहत नाही तरीही जिकडे–तिकडे पाणीच पाणी दिसते तसेच मत्तज्ञानीला करण्यांमध्ये उध्दार होण्याचे तत्त बिज राहत नाही तरीही जिकडे–तिकडे तत्त बिज दिसते ह्या करण्या पुण्य व पापाच्या गाठोड्या आहेत हा धर्म पापाच्या गाठोड्या पाण्याला काळापासून उध्दार न करता चौऱ्यांशी लाख योनीत फिरवतात. ।।२।।

**मन बिन जीव जीव बिन काया ।। यूँ तत्त बिन मत सारा ।।**

**के सुखराम सकळ पिछतासी ।। अंत काळ की बारा ।।३।।**

जसे जीवाच्या शिवाय मन व काया मृतक आहे,चेतन नाही,अचेतन आहे,बिना कामाची आहे तसेच तत्तच्या शिवाय मत्तज्ञानाच्या सर्व पाप पुण्यच्या करण्या आहे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे मत्त,मत्तज्ञान त्याग व तत्तज्ञान धारण कर.।।३।।

३४२

।। पदराग मिश्रित ।।

**संतो भाई अे क्यूँ मोख न जावे**

**संतो भाई अे क्यूँ मोख न जावे ।। नाँव बिना गत पावे ।।टेर।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की नामाचे स्मरण केल्या शिवाय चांगल्या स्वभावाने गती झाली असती तर चौऱ्यांशी लक्ष योनीतील प्राण्यांची ही गती होईल. ।।टेर।।

**गडरी सरभर गरिब न कोई ।। सिंघ सम नहि झूठा ।।**
**बेस्या आस सकळ की राखे ।। कोडी जुग सू रूठा ।।१।।**

जर गरीब स्वभावाने गती झाली असती तर बकरीचा स्वभाव कुद्रती जन्मत: गरीब आहे तर बकरीची गती निश्चितच व्हायला हवी होती परंतू बकरीची गती होत नाही पुढच्या चौऱ्यांशी लक्ष योनीत आपले कर्म भोगण्यास जाते व दु:ख भोगते सिंह नेहमी खोटा झुकलेला असतो सर्वांशी डोके झुकलेले ठेवल्याने मोक्ष झाला असता तर सिंहाचा प्रथम झाला असता त्यांचे डोके झुकलेले ठेवल्याने मुक्ती होत नाही तो पुढच्या योनीत काळाचे दु:ख भोगण्यास जातो वेश्या सर्वांची भोग आशा पूर्ण करते सर्वांची आशा पूर्ण केल्याने मोक्ष मिळाला असता तर वेश्येला सर्व प्रथम मोक्ष मिळाला असता परंतू वेश्या शरीर सुटल्यानंतर यमाच्या नरकात पडते संसार त्यागल्याने मोक्ष झाला असता तर कोडी पूर्ण संसाराला त्यागून एकटा राहतो तो कोडी मोक्षाला जात नाही दु:ख भोगण्यास चौऱ्यांशी लक्ष योनीत पडतो.।।१।।

**कवो कड़वी बाण बोले ।। मेना बेण सु प्यारा ।।**
**रासब रोड़ी ज्याँ त्याँ लोट ।। अजिया कीच तज गारा ।।२।।**

कडू बोलण्याने मोक्ष झाला असता तर कावळा कडू वाणी बोलतो तर कावळ्याचा मोक्ष झाला असता परंतू कावळ्याचा मोक्ष होत नाही तो पुढच्या चौऱ्यांशी लक्ष योनीच्या दु:खात पडतो गोड वाणी बोलण्याने मोक्ष झाला असता तर मैनेचा झाला असता परंतू मैनेचा मोक्ष होत नाही व कर्म भोगण्याकरीता पुढच्या योनीत पडते राख लावल्याने मोक्ष झाला असता तर गाढव क्षणाक्षणात राखेत लोळतच असतो व चारी बाजूने आपल्या शरीरावर राख लावतो परंतू गाढव आता पर्यंत(आजच्या दिवसापर्यंतही)कधी मोक्षाला गेला नाही पुढचे दु:ख भोगण्यास दुसऱ्या योनीत जन्मला.निटनेटके पणा(साफ सुतरे पण) मोक्ष मिळाला असता तर बकरी आपल्या शरीरावर थोडासाही गारा(घाण)सहन करीत नाही व आपले शरीर गाऱ्यापासून साफ करत असते तरीही बकरीचा मोक्ष होत नाही ती दु:ख भोगण्यास पुढच्या योनीत जन्मते. ।।२।।

**लूंकी बाघ बघेरा बन में ।। स्याळ सुसा बोहो होई ।।**
**बस्ती बीच स्वान रहे मिनकी ।। अर जगत रहे लोई ।।३।।**

वस्ती त्यागून वनात राहिल्याने परममुक्ती झाली असती तर वनातील लोमडी,वाघ, ससा सारखे वनात राहणारे सर्व प्राण्यांची झाली असती व वनात राहून परममुक्ती

झाली असती तर वस्तीत राहणारे कुत्रे,मांजरी,गाय,बैल,स्त्री–पुरुषांची झाली असती परंतू यांच्यातील कोणा एकाचीही मुक्ती होत नाही सर्व दु:ख भोगण्यास पुढचे शरीर धारण करतात. ।।३।।

**तिरिया समज रमे सुख सेजा ।। कांही भोळप हुवे संगा ।।**

**कह सुखराम थके गुण नाही ।। गरभ बंधे घट चंगा ।।४।।**

जसे स्त्री समजून पुरुषा सोबत संग करुन सुख सेजमध्ये रमली किंवा भोळेपणात रमली दोघांना गर्भ राहण्याचा गुण लागतो असेच प्राण्यांमध्ये भोळेपणात गरीब,त्याग,वनात राहणे हा गुण आहे तर साधू समजून उमजून गरीब,त्याग,वनात राहणे हा गुण धारण करतात परंतू जसे स्त्रीने भोळेपणात किंवा चतुरपणात पुरुषाचा संग केला तरी ही स्त्रीला गर्भ राहतो असेच भोळेपणात करा किंवा चतुरपणात करा चौऱ्यांशी लक्ष योनीच्या प्राण्यापासून साधू पर्यंत मोक्ष मिळायला हवा परंतू चौऱ्यांशी लक्ष योनीच्या एकाही प्राण्याला मोक्ष मिळत नाही तर साधूला मोक्ष कसा मिळेल?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,संग करा किंवा भोळेपणात संग करा सतगुरुची विधि करण्याने भवसागरातून तिरण्याचा गुण लागतोच लागतो. ।।४।।

३५०

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**संतो भाई अे क्युँ मोख न जावे**

**संतो भाई अे क्युँ मोख न जावे ।। नाँव बिना गत पावे ।।टेर।।**

संतो भाई हे मोक्षास का जात नाही.(नावेशिवाय नदीच्या पार जाता येत नाही तसेच) रामनामाच्या नावाशिवाय गती मिळत नाही.।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की नामाचे स्मरण केल्या शिवाय चांगल्या स्वभावाने गती झाली असती तर चौऱ्यांशी लक्ष योनीतील प्राण्यांची ही गती होईल.

**निसड़ो निमणो इण सम कुण हे ।। गाव बाग के जोड़े ।।**

**थावंर जीव हाले नहि डोले ।। इजगर मुख ना मोडे ।।१।।**

निसर्डा(बेहया,बेशरम)गांवासारखा व नमणारा वाघासारखा दुसरा कोण आहे.(वाघ नमत नमत चालत असतो व दुसऱ्या जनावरावर झडप घालण्याच्या वेळी अगदी नमुन जमीनदोस्त होऊन जात असतो.)(हे दगाबाज फार नमत असतात.कोणी एकाने सांगितले आहे.

।। दगाबाज दुणानिवे चित्ता चोर कुबाण ।।

कबाण दुसऱ्यास मारण्यासाठी लवत असते.असाच चित्ता दुसऱ्यावर झडप घालण्याच्या वेळी लवत असतो व चोरही चोरी करण्याकरिता लवत लवत जात असतो.असाच विहीरीवर पाणी काढण्याचा झोका असतो.ते पाणी जे जीवन आहे,(पाण्याच्याने सर्व

जगतात)असे जीवनरुपी पाणी हरण करुन घेऊन जातो.)तर नमण्याने मोक्ष झाला असता तर वाद्यांचा का होऊ नये व हालत नाही,चालत नाही अशांचा मोक्ष झाला असता तर सर्वही स्थावर जीव हालत नाही व डोलत नाही.हे स्थावर मोक्षास का जात नाही व इकडे तिकडे खाण्यास आणण्याकरिता जात नाही व त्यांचा मोक्ष होतो तर अजगर इकडे तिकडे तोंड फिरवून काही खात नाही.तोंड उघडून अजगर पडलेला राहतो.त्याच्या तोंडात आपलमती कोणी जीवजंतू जातो.त्यास गिळून घेतो.तर अजगर मोक्षास का जात नाही. ।।१।।

**मिनखा देहे बिन सरब त्यागी ।। माया गह न कोई ।।**
**ओ दर के उनमान लेहेणा ।। ओर पडीरो छोई ।।२।।**

हे संग्रह करणारे फक्त मनुष्यच आहेत.मनुष्याशिवाय कोणी संग्रह करत नाही.मनुष्य देहाशिवाय बाकी सर्व त्यागी आहेत.त्यागन केल्याने मोक्ष होते तर हे मोक्षास का जात नाही.दुसरे कोणीही प्राणी,माया(रुपये पैसे)ग्रहण करत नाही.तर हे मोक्षास का जात नाहीत.सर्व प्राणी आपल्या पोटात मावेल इतकाच घेतात.बाकी जेथला तेथेच पडलेला राहून देतात.तर हे मोक्षास का जात नाही. ।।२।।

**सिंगल दीप जती बोहो तेरा ।। घर घर मे नर झूले ।।**
**नारी संग जे जनम सो बीते ।। सपने काछ न खूले ।।३।।**

सीव्हील व्दिपात यती पुष्कळ आहेत.घरा घरात हे यती झुलतात.(      )तेथे पूर्वी स्त्री राज्य होते.तेंव्हा त्या राज्यात यती(इंद्रिये जिंकणारे)जात असे. त्यांच्या इंद्रियाची तेथील स्त्रिया पुजा करीत असत.पुजा करतांना इंद्रीये चैतन्य झाले तर त्यास मारुन टाकत असे व इंद्रीय चैतन्य न झाल्यास त्याची मोत्याने पुजा करुन ते त्यास मोती देऊन देत असत.कोणी हिजडा(नपुंसक)किंवा खाच्ची केलेला मनुष्य असत व परीक्षा करतांना त्याची इंद्रिये चैतन्य झाली असती तर त्यास अंगभंग करुन मुलखाच्या बाहेर काढीत असत.जर त्यांचा मोक्ष होतो तर ते मोक्षास का जात नाही.ते यती जन्मभर स्त्रियासंगे राहीले तरी त्यांचे लंगोट स्वप्नातही सुटत नाही. ।।३।।

**अन जळ ओषद धीरत गोऊँ ।। बिष अमीरस पीया ।।**
**कह सुखराम भूक तिस जावे ।। कोई अमर हुवे ना जीया ।।४।।**

यांच्याने म्हणजे अन्नाने,पाण्याने व औषधीने व तुपाने व गव्हाने भुक व तहान जाते व विषावर अमृत प्याल्याने जिवंत होऊन जातो.परंतु यांच्याने कोणी अमरही झाला नाही व कोणी मेलेलाही जीवंत झाला नाही.याच प्रमाणे वरील दुसऱ्या गोष्टीने भुक,तहान जाण्यासारखे दुसरे फळ मिळून जाईल,परंतू मोक्षास कोणी जाणार नाही,असे सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले. ।।४।।

३६७
|| पदराग सोरठ ||

**संतो ओ जग बडो अग्यानी**

**सत बात कूं असत केत हे || असत सत्त कर मानी || टेर ||**

हे जग मोठे अज्ञानी आहे हे खऱ्या गोष्टीला खोटे मानत आहे व खोट्या गोष्टीला सत्य मानत आहे हे तत्त भेदाला खोटे मानत आहे व माया जी काळाच्या मुखात टाकते तिला काळ मारणारी सत्त मानतात. ||टेर||

**स्पर्श चीज ध्रम की पेड़ी || तां कूं क्रम ठेरावे ||**

**अमल तमाखू मुळ पाप को || सो सबके मन भावे ||१||**

गृहस्थी,स्पर्श वस्तू ही धर्माची पायरी आहे अशी पायरी तिला पाप कर्म म्हणून मानतात व अफीम,तम्बाकू जे पाप कर्माचे मूळ आहे ते सर्वांच्या मनाला(मनात)आवड्ते.||१||

**साधन कूं क्है हरि भगतीया || क्रमी कुं क्हे माटी ||**

**आन देव कूं लुळ लुळ पूजे || म्हाप्रसाद ने बाटे ||२||**

साधूला हरी भक्त म्हणून निंदा करतात व पापीला मोठा मर्द मानतात सत रामजीला त्यागतात व भेरु,भोपा,सितला,दुर्गा इत्यादी देवी देवतांना झुकून झुकून पूजतात व त्यांच्या भोजनाला बारीचा महाप्रसाद म्हणतात. ||२||

**कन्या असल ध्रम को कूपो || सो जनम्यां व्हे कारो ||**

**पुत्तर जायां थाळ बजावे || सो क्रमा को भारो ||३||**

कन्या ही धर्माची विहिर आहे ही दुसऱ्याचे(परक्याचे)घर बसवते अशी कन्या जन्मताच बेचैनी होते,उदास होऊन जातात जेव्हा की पुत्र कर्माचा भार आहे त्याच्या जन्माने (त्याच्या जन्म झाल्यावर)थाळी वाजवतात,उत्सव मनवतात(उत्सव)||३||

**खट क्रम ऊठ करे नित कोई || तां कूं जोर सरावे ||**


**के सुखराम तत्त का भेदी || ज्यांरी निंद्यां गावे ||४||**

नेती–धोती,नवली बस्ती,कपाली वेगवेगळे त्राटक असे,योगाचे सहा कर्म आहेत असे काळाच्या मुखात टाकणारे सहा कर्म करणाऱ्यांची शोभा करतात व त्यांना मोठे षटकर्म करुन शोभा करतात व जो काळाला मारुन चुकला आहे असा तत्त भेदी आहे त्याची हर भक्त्या करुन निंदा करतात असे जगातील लोक आहे सत्य गोष्टीला असत्य गोष्ट म्हणून निंदा करतात व असत्य गोष्टीला सत्य म्हणून शोभा करतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ||४||

३६९
|| पदराग भेरू (प्रभाती) ||

**संतो सत्त सबद सो न्यारा**

**संतो सत्त सबद सो न्यारा || को जाणे हरजन प्यारा ||टेर||**




सतस्वरुप=सतशब्द=कुद्रतकला=ने:अक्षर=५२अक्षरात येत नाही, बोलले जात नाही,ऐकण्यात येत नाही,समजावला जात नाही,लिहिला जात नाही असा हा सतशब्द मायेच्या शब्दापेक्षा वेगळा आहे कारण मायेचा शब्द ५२ अक्षरात येतो,बोलले जातात,लिहिला जातो,ऐकू येतो,समजावले जातात.या सतशब्दाला कोण जाणेल?जो कोणी हरिजन आहे म्हणजे हरिचा प्रिय आहे,ज्याने हरीला म्हणजे रामजीला प्राप्त केले आहे तोच सतशब्दाला जाणेल,समजेल.हरीजन जाणणे म्हणजे ही कसे तर पूर्णपणे,पूर्ण देहात जाणणे,समजणे आणि त्याला रात्रंदिवस स्मरतो ही आहे. ।।टेर।।

**सील झूट संतोष सारा ।। झूट सत्त जत्त दोई ।।**
**भेद बिना सब ग्यान झूटो ।। माया को अंग होई ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,शील ठेवणे म्हणजे ब्रम्हचर्याचे पालन करने हेही खोटे आहे.शील ठेवण्यातही परमात्मा आहे,हे समजने खोटे आहे.असेही संतोष ठेवणे म्हणजे जेवढे ज्याचे जवळ आहे,त्याचातही संतुष्ट राहतो,हे संतोष ठेवणे ही खोटे आहे.सत्त ठेवणे म्हणजे कोणी देह मागेल तर त्याला देऊन टाकणे किंवा कोणतीही वस्तू मागेल त्यास ती देऊन टाकणे,असे सत्त ठेवणे ही खोटे आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ब्रम्हभेदा शिवाय हे शील ठेवणे,संतोष ठेवणे,सत्त ठेवणे,जत्त ठेवणे,खोटे आहे.)।।१।।

| शील ठेवणे,संतोष ठेवणे,सत्त राखने,जत्त राखने=मायाचे अंग,<br>म्हणजे यांची उपज माया पासुन आहे.<br>= कर्म लागते == महादु:खात पडतात.<br>= ५ आत्मा,मन हे निघत नाही. | ब्रम्ह भेद(सतस्वरुप)<br>= ५ आत्मा,मन सुटते.<br>= कर्म लागत नाही.<br>= महादु:ख मिटते. |
|---|---|

परंतु या जीवाची चाहना या महादु:खातून निघण्याची आहे आणि जीवाची चाहना तर याचाने पूर्ण नाही होत.हे सर्व मायाचे अंग ब्रम्हचा भेद विना खोटे आहे.असा हा सत शब्द या मायाचा अंगाहून वेगळा आहे.हे सर्व सतशब्दाचा भेदा विना खोटे आहे.


**बाणी खाणी सरब झूठी ।। झूठा बेद कुराणा ।।**
**क्रिया करणी जप तप सारे ।। तपसी तत्त ना जाणा ।।२।।**

वाणी(परा,पश्यंती,मध्यमा,वैखरी)खोट्या आहे,का खोट्या आहे-परा,पश्यंती,मध्यमा, वैखरी=बोलली जाते=लिहीली जाते=५२ अक्षरात येते=माया आहे=नश्वर= परमात्मा (परमसुख नाही आहे.)खाणी(अंडज,जरायुज,अंकुर,उद्‌भीज)सर्व खोट्या आहे.खाणी =८४,००,००० योनी आहे=महादु:ख आहे=परमसुख नाही आहे.या सर्व खाणी खोट्या आहे.वेदही खोटे आहे.वेदाचा कर्ता=ब्रम्हा=काळाचा मुखात आहे.वेद आणि कुराण

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

खोटे आहे.क्रिया आणि करणी करणारे,मायाचा जप करणारे,मायाचा तप करणारे,५ इंद्रियाला मारणारे पण त्या तत्तसार सतशब्दला ही जाणले नाही.कारण की यांची समज, सोच,बुध्दी,मायेपर्यंत ही आहे.परंतु हा सतशब्द मायेचा परे आहे.या करीता या सर्वांनी सतशब्दला जाणले नाही.।।२।।

**ओऊँ सोऊँ त्याग तपस्या ।। तामस सत्त रज सोई ।।**
**कह सुखराम सरब अंग माया ।। काळ सकळ सिर होई ।।३।।**




ओअमची भक्ति करने,सोहंची भक्ति करने,मुळ मायेचा त्याग करने,तपस्या करने,तमोगुणी महादेवची भक्ति करने,सत्वगुणी विष्णूची भक्ति करने,रजोगुणी ब्रम्हाची भक्ति करने,हे सर्व आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मायेचे अंग आहे आणि सर्वाच्या वर काळ आहे.असे हे सर्व काळाचा मुखात बसले आहे.महाप्रलयात सर्व मिटून जाते.।।३।।

१४
।। पदराग बिलावल ।।

**एसा भेव बतावज्यो**

**एसा भेव बतावज्यो ।। समरथ गुरू मेरा ।।**
**राम मिलो इण देहे मे ।। काढु बिष झेरा ।।टेर।।**

हे माझे समर्थ सतगुरु माझ्या घटात रामजी मिळतील व माझी विषय वासना नष्ट होऊन जाईल असा मला भेद सांगा. ।।टेर।।

**कुदरत तेरी सांईयाँ ।। मुज लखी न जावे ।।**
**मो मन एसी ऊपजे ।। केसे हर पावे ।।१।।**

हे साई आपली कुद्रत माझ्याने समजली जात नाही म्हणून घटात हर आपणास कसे प्रगट करु याची मनात चिंता उपजली आहे. ।।१।।

**देहे अस्तल ना रूप के ।। घर गाँव न काया ।।**
**किस बिध मेळा कीजिये ।। तिरभन पत राया ।।२।।**

हे रामजी,आपले सर्वांना समजेल असे स्थुल रुप नाही,आपले कोणते घर नाही,आपले कोणते गाव नाही तसेच आपल्यास समजेल असा कोणी देह नाही तर हे त्रिभुवनाचे पतीराज आपल्याशी कसा मिलाप करु?।।२।।

**पूरब प्रीत पिछाण के ।। मेरो घर आवो ।।**
**मै दुखियां तुम बाहिरां ।। मुज दरस दिखावो ।।३।।**

आपण माझ्या पूर्वीच्या प्रेम प्रितीची जाण ठेवून माझ्या घरी यावे आपल्या शिवाय मी खूप दु:खी आहे मला आपण घटात दर्शन द्या. ।।३।।

मै निरबळ बळहीण हूँ ।। मुज सजे न काई ।।
सरणा गत सुखराम हे ।। हर मिल मन मांई ।।४।।

मी निर्बल आहे,बलहिन आहे,माझ्यात आपणास प्राप्त करण्याची जराही ताकद नाही तसेच आपणास प्राप्त करण्याचे माझ्यात काही साधले जात नाही परंतू मी आपल्या शरणात आहे म्हणून आपण माझ्यामध्ये(प्रगटून)मला भेटा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

१३४
।। पदराग जैजेवन्ती ।।

गुरूजी कारज किस बिध कीजे
ज्हाँ जाऊँ जहाँ सझे ना काई ।। नाव किसी बिध लीजे ।।टेर।।

गुरुजी माझ्या जीवाचा काळापासून मुक्त होण्याचे माझे कार्य कोणत्या प्रकारे मी करु? जेथे जेथे जातो जे जे करतो त्याच्यात नाम घेण्याची विधि नाही तर माझे कारज कसे होईल. ।।टेर।।

ग्रेहे जे बांध उधम म्हे ठाणू ।। तो चिंता बोहो ऊठे ।।
त्यागी होय मांगणे जाऊं ।। तो मंछया मेहेरी लूटे ।।१।।

गृहस्थीमध्ये राहून निर्मलतेने धंदा करुन पोट भरतो तर पोट भरण्यापूरते ही धन मिळत नाही याकारणाने संसार कसा चालेल याची चिंता सतावते संसार त्यागून त्यागी बनून मागून पोट भरतो तर पोट भरण्यापेक्षा जास्त भाकरी मिळते परंतू पाची इंद्रियांची इच्छारुपी पत्नी रात्रंदिवस भोगाकरीता सतावते. ।।१।।

बन मे जाय बेस रूँ सामी ।। तो मुज खुद्या सतावे ।।
कंद मूळ जो खिण खिण खाऊँ ।। तो मन धीर न आवे ।।२।।

मोह माया पकडू नये म्हणून स्त्री मुक्त अशा वनात जाऊन बसतो तर भूक लागल्यावर पोळी कोणाकडून मिळत नाही भूक लागल्यावर खोदून खोदून कंदमूळ खातो तर मनाला पोट भरण्याचे जराही वाटत नाही उलट जोराची भूक लागली आहे असे वाटते अशी भूक सतावते.।।२।।

मन कूं घेर ताव दूं भारी ।। तो तन सहेन कोई ।।
ललफल की हर माने नाही ।। ओर न सूझे हे मोई ।।३।।

मनाला पाची वासनापासून रोखण्याकरीता ताप देतो तर देह(शरीर)हा ताप सहन करु शकत नाही ललफलमध्ये भक्ती केली तर रामजी मानले नाही ललफल मध्ये भक्ती केल्या शिवाय मला दूसरा उपाय दिसत नाही. ।।३।।

पांचाँ माँय जाय जो बेसूं ।। तो मन झोड चलावे ।।
के सुखराम अेकलो बेठां ।। निद्रा आलस आवे ।।४।।

पाच सात मित्र मंडळी जेथे जमते तेथे जातो तर ज्याच्यात राम नाही अशा बेफिजुलच्या गोष्टी माझे मन करते व एकटा बसतो तर आळस निद्रा खूप सतावते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

१६७

।। पदराग जोग धनाश्री ।।

**जंतर मंतर अेक न जाणुं**

**जंतर मंतर अेक न जाणुं ।। झाड़ा झपाड़ा कौ मेरे बे ।।**
**ना मे बेदज दर्द नहीं जाणुं ।। साहिब सरणे तेरे बे ।।टेक।।**

मी कोणाला रोग जाणत नाही व रोग निवारण करणारे मंत्र,जंत्र,झाडा,झपाटा तसेच वैद्यज्ञान समजणे चाहत नाही मी तर फक्त आपला शरणा घेणे व आपले स्मरण करणे जाणतो.।।टेर।।

**अरज सुणो अर सन्मुख जोवो ।। दुख ताव सब खोवो बे ।।**
**बिडद तुमारो प्रभु म्हे अेसो सुणियो ।। नारी को नर होवे बे ।।१।।**

प्रभू आपण माझे भवसागरातून उध्दार होण्याचे सर्व दुःख,त्रास मिटवून द्या प्रभू मी आपण दुःखी नारीला पुरुषी नर करु शकतात असे आपले बिड्द आहे हे ऐकले. ।।१।।

**गज का प्रभू फंद तुमने काटया ।। छिन मे बाहिर लीयो बे ।।**
**सुणज्यो साहेब सम्रथ मेरा ।। बिडद प्रगट ओ कीया बे ।।२।।**

प्रभू शरण आलेल्या हत्तीचे क्षणात काळाचे फंद कापले व काळापासून बाहेर म्हणजे मुक्त करुन भवसागरात बुडू दिले नाही असे आपण आपले बिड्द हत्तीसाठी प्रगट केले तसेच मी ही आपल्या शरणात आलो आहे माझे ही भवसागरात बुडण्याचे दुःख कापा. ।।२।।

**दुखिया का प्रभू सब दुख काटो ।। इम्रत बाणी ले भाको बे ।।**
**केतो दास के पास न मेलो ।। के बिड़द तुमारो राखो बे ।।३।।**

आपण(जगातील)स्त्री–पुरुषांचे सर्व काळाचे दुःख कापतात तसेच माझे दुःख कापा.मी ही आपला दास आहे किंवा आपण अमृतवाणी म्हणजे गोड शब्दांनी बोलून द्या की काळाचे दुःख मिटविण्याकरीता माझ्या जवळ येऊ नकोस का जे दुःख देतो ते भोगून घ्या तर मी ते दुःख भोगत राहिल आपल्या शरणात राहिल्याने काळाचे दुःख मी भोगू तर त्याच्यात तुमचे बिड्द जाते ते बिड्द जाऊ देऊ नका त्या बिड्दला राखा. ।।३।।

**दास तों प्रभू तुज पुकारे ।। आन ओर नही माने बे ।।**
**जिण जिण बिध प्रभु आप गूसांई ।। हरजन कछु नही जाने बे ।।४।।**

मी तर तिरण्याकरीता संसारात फक्त आपला शरणा आहे हे जाणतो आणि ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती,अवतार या सर्वांचा शरणा तिरण्याकरीता खोटा आहे हे समजतो

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

म्हणून मी फक्त तुम्हाला(पुकारतो)हरीजन कसा तिरतो हे जाणत नाही कोणकोणत्या विधिने हरीजन तिरेल ही विधि फक्त आपणच गुसाई(गोस्वामी) जाणतात. ।।४।।

**जुग जुग जन की थे स्हायज कीनी ।। भीड़ पड़ी त्याहाँ आया बे ।।**
**सिंवऱ्या जुग जुग आप पधारे ।। बिड़द बां का तुज गाया बे ।।५।।**

जेव्हा जेव्हा ही कोणावर काळाचे दु:ख पडले व ज्याने ज्याने तुला दु:खात आठवण केले त्याची आपणच सहायता केली तुझे असे बिड्द आहे असे त्या सर्व हरीजनांनी गायले आहे.।।५।।

**के सुखराम सूणो हर मेरी ।। मो सामो दिल दीजे बे ।।**
**कामी क्रोधी तोइ हुँ तेरा ।। सहाय बिड़द सुण कीज्यो बे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,माझे ऐका,असेच त्यांच्या सारखे माझ्याकडे ही नजर फिरवा व माझे काळाचे दु:ख निवारण्याकरीता तुमचे हृदय द्या.मी कामी,क्रोधी आहे तरीही मी तुमचा आहे हरीजनाला सहायता(मदत)करणे हे तुमचे बिड्द आहे तशीच माझी ही सहायता करा. ।।६।।

२०२

।। पदराग कानडा ।।

**किरपा करो गुरू सिष कूं रे तारो**

**किरपा करो गुरू सिष कूं रे तारो ।। भरम करम मन ममता मारो ।।टेर।।**

हे माझे सतगुरु साहेब आपण माझ्यावर कृपा करा व माझे भर्म,कर्म,मन व माझी ममता मारा.।।टेर।।

**जनम जनम मे बोहो दुख पाया ।। ता ते अब सरण तुमारी आया ।।१।।**

मी माझे भर्म,कर्म,मन,ममता यांच्या कारणाने मी जन्मा जन्मापासून खूप दु:ख प्राप्त केले आहे या दु:खापासून सुटण्याकरीता मी आपल्या शरणात आलो आहे. ।।१।।

**एसा निज भेव भेद मै पाऊँ ।। आवागवण बोहोड नही आऊँ ।।२।।**

मला आपण मी नेहमी नेहमी आवागमनात येणार नाही असा निजपदाचा निजभेद द्या. ।।२।।

**तुम दाता मै मंगता हुँ तेरा ।। सुण साहेब गुरू समरथ मेरा ।।३।।**

हे समर्थ गुरुसाहेब फक्त आपणच निजभेद देणारे दाता आहात व मी निजभेद मागणारा मंगता आहे. ।।३।।

**केहे सुखराम गुरा दान दे सांई ।। परमपद बिन लेंसुं नाई ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सतगुरु समर्थांना सांगतात की मला दानात भर्म, कर्म,मन,ममता मारणारे परमपद हवे मला होणकाळातील दूसरी कोणती वस्तू नको म्हणून मी आपल्याकडून परमपदा शिवाय दूसरी वस्तू घेणार नाही. ।।४।।

२०४

।। पदराग जोगारंभी ।।

**कोहो इण मन सु क्या करूं**

**कोहो इण मन सुं क्या करूं ।। किण बिध ल्युँ समझाय ।।**
**जागरत सुषोपत सपन मे ।। निसदिन बिषे मत खाय ।।टेर।।**

हे माझे मन जागृत अवस्थेमध्ये स्वप्न दशेत व गाड झोपेत नित्य विषयरस मथमथकर खातो अशा माझ्या मनाचे मी काय करु?मी त्याला कोणत्या विधिने समजाऊ.।।टेर।।

**साध संगत गुरू टेल के ।। नेड़ो आवे नहि कोय ।।**
**भजन करन कूं बेसिया ।। तब मन रेवे वो सोय ।।१।।**

हे माझे मन साधू संगत तसेच गुरुच्या सेवेच्या जवळ जराही येत नाही व मी भजन करण्यास बसतो तर माझे मन झोपण्याचा विचार करते व स्वत: ही झोपते व मला ही झोपवून देते. ।।१।।

**आठ पोहर परमोद द्युँ ।। तोई वो बोले नही साच ।।**
**कोट जतन लख बीनती ।। कर कर दीटी म्हे खाच ।।२।।**

मी आठो प्रहर चोविस तास रामजीचा उपदेश देतो की रामजी सत्य आहे व विषय विकार खोटे आहेत तरी ही हा सत्य रामजीला भजत नाही मी माझ्या मनाने विषय विकारात न पड्ण्याकरीता लाखो प्रकारच्या विनंत्या केल्या व लाखो प्रकाराने रागावून पाहिले परंतू हे माझे मन जराही मानत नाही. ।।२।।

**धरम पून सत्त जत्त कुं ।। भूले न पकडेनी बीर ।।**
**भगत मुगत हर भजन की ।। अंतर ब्यापे नहिं पीर ।।३।।**

हे मन ज्याच्याने रामजी घटात प्रगटतील असे सत धर्म सत पुण्याला,जतीपण म्हणजे शिलाला चुकूनही धारण करीत नाही माझ्या मनाला परममुक्तीची रामजीच्या भजन भक्तीची जराही पीडा म्हणजे चिंता व्यापत नाही. ।।३।।

**केह सुखदेव मै काद्यो ।। इण मन माया कूं जोय ।।**
**राम निभावे तो नीभु ।। नीतो निभणो न होय ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मी माझ्या मनाने व मनाच्या विषय वासनांच्या निच मायेने कंटाळून गेलो त्रासून गेलो मला रामभजन करण्यात रामजीने निभावले तरच मी निभावेल नाही तर माझे निभणे खूप मुश्किल कठीण आहे. ।।४।।

२१२

आदि सतगुरु सुखरामजी महाराज या पदात जीव हंस भावाने सांगतात की,मी या जगात खूप दु:खी आहे म्हणजे या जीवाच्या वर हे मालिक,परमात्मा आपणास प्राप्त केल्या शिवाय महादु:ख(पडून राहिले आहे)आपल्या शिवाय या जगात जेव्हा पासून हा जीव

जन्मला तेव्हा पासून आजपर्यंत हा दु:खी आहे आणि आपणच मला या दु:खातून बाहेर काढू शकता या जगात दु:ख कसे कसे आणि कोठे कोठे आहे ही गोष्ट समजावण्याकरीता संत सांगतात की,

**जा दिन जीव जन्मीया,कबहु न पायो सुख**
**डाले डाले मैं फिरा,पाते पाते दु:ख**

संत म्हणतात(सांगतात)जेव्हा पासून हा जीव पारब्रम्ह पासून मायेच्या सृष्टीत आला तेव्हापासून त्याला आजपर्यंत रत्तीभर ही सुख मिळाले नाही मी जेथे जेथे ही या सृष्टीत गेलो तेथे मला दु:ख,दु:ख आणि दु:खच दिसले.

।। पदराग हिन्डोल ।।

**मे बोहोत दुखी जुग माय**
**मे बोहोत दुखी जुग माय ।। स्मरथ सर्णे लीजे हो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जीव रुपास सांगतात की,मी होणकाळ जगात खूप दु:खी आहे हे समर्थ साई मला आपल्या शरणात घेवून घ्या म्हणजे आपले बनवून घ्या हा जीव दु:खी का आहे?आणि समर्थचा शरणा का घ्यायचा?या जीवावर दु:ख का पडतात याचे मूळ कारण काय आहे?आधी पासूनच या जीवाच्या सोबत ५ आत्मा आणि मन आहे हा जीव मन व पाच आत्म्यांच्याद्वारे मायावी विषय वासनांच्या सुखात रमतो याकारणाने या जीवावर दु:ख पडतात याकारणाने हा जीव मायावी विषय विकार मिटविण्याकरीता या महादु:खातून निघण्याकरीता त्रिगुणी मायेच्या भक्त्या साधतो परंतू याच्याने विषय विकार मिटत नाही तर हे विषय विकार केव्हा मिटतील तर जेव्हा आम्ही समर्थ साईच्या शरणात जाऊ आणि घटात सतस्वरुप साई प्रगट करुन घेवू तेव्हाच (तरच)५ आत्मा,मन हंसापासून वेगळे होईल आणि हंस सदाकरीता महासुखात जाईल म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज एका ठिकाणी म्हणतात(सांगतात).।।टेर।।

''अरज करे सुखराम गुसाई, सुण साहिब हर रामा ।
मैं तो शरण तुमारी आयो, मोह दिखावो निजधामा ।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज साईला विनंती करतात की,हे साई साहेब,हर, रामजी मी आत तुमच्या शरणात आलो आहे तर आपण मला आपला निजधाम दाखवा म्हणजे मला या महादु:खातून मुक्त करुन आपले परमसुखाचे पद द्या.

**जुग जुग रूं मे तुमरी लारा ।। दास न दूरा कीजे हो ।।१।।**

मी युगा युगात तुमच्या मागे म्हणजे तुमच्या शरणात राहिल म्हणून आपल्या दासास आपल्या पासून दूर करु नका. ।।१।।

मै अरज करु गुरा थाने, चरणा में राख ज्यो माने ।
हे लो परगट केहुँ के छाने, आ लाज शरम सब थाने ।

संत सांगतात की,सतगुरु साई आपण मला आपल्या शरणात ठेवा आपल्या शरणा शिवाय मला कोणाचा शरणा आवडत नाही.तर हे समर्थ साई माझी लाज शरम सर्व आपणासच (आपल्यालाच)आहे,तर आपण मला आपल्या शरणातून दूर कधीही करु नका आदि सतगुरु सुखरामजी महाराज

दास तो प्रभू तुज पुकारे, आन ओर नही माने बे ।
जिण जिण बिध प्रभु आप गुसाई, हरजन कुछ नही जाने बे ।

हे प्रभू,दास म्हणजे मी तर आपणास पुकार करीत आहे म्हणजे आपल्या शरणात आहे आणि आपल्या शरणा शिवाय मी जगाचे ३ लोक १४ भवन आणि कोणत्या ज्ञान,ध्यान, विधि,भेदाला मानत नाही ज्या ज्या विधित हे प्रभू हे गुंसाई आपण आहात त्या विधिच्या शिवाय हरजन म्हणजे मी काहीच जाणत नाही म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज परमात्म्यास सांगतात(म्हणतात)हे साई आपण मला आपल्या पासून दूर करु नका या होणकाळ जगात खूप भारी महादु:ख आहे आणि ते समर्थशाली मालकाचा शरणा घेतल्या शिवाय सुटू शकत नाही हिच गोष्ट आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वत:ला समोर ठेवून जगातील सर्व जीवांना समजावत आहे.

**जुगन जुगन मे फिरियो चोरासी ।। जनम जनम दुख पायो हो ।।२।।**

मी युगायुगापासून ८४,००,००० योनीत फिरत आहे या ८४ लक्ष योनीमध्ये जन्मों जन्मी म्हणजे अनंत युगापासून आधी,व्याधी,उपाधिचे अपार दु:ख भोगत आहे.।।२।।

दोजख दुख जम की मार, जलम मरण दुख भारी ।
लख चौरासी बार न पारा, भुगते गो जुग चारी ।

जन्मणे–मरणे हे भारी दु:ख ८४,००,००० योनीचे भारी दु:ख चारी युगांपर्यंत पडते म्हणून आपण मला आपल्या शरणात ठेवा एक ८४,००,००० योनी म्हणजे किती वेळ

चार जुगा बरस बदिता, लाख तीन चालीसा ।
अे ती मार सहे सिर उपर, ओर सहेसर बीसा ।

म्हणजे ८४,००,००० योनी भोगण्याकरीता ४३,२०,००० वर्ष लागतात आणि इतक्या वर्षा पर्यंत हा जीव दु:खात राहतो आणि आम्ही अशा अनंत ८४ पासून या महादु:खात आहे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील जीवांना समजावत आहे की,८४,००,००० योनींचे असे जन्मणे मरण्याचे भारी महादु:ख भोगावे लागते म्हणून आपण सर्व या दु:खातून निघण्याकरीता खरा तो समर्थ आहे त्याचा शरणा घेऊन घ्या.

**सुरपुर नरपुर प्यांळज देख्या ।। मासो सुख काहुँ नाही हो ।।३।।**

मी मायेच्या सुखाचा स्वर्गादिक पाहिला मनाप्रमाणे सुख कर्म करण्याकरीता स्वतंत्र असा मनुष्य लोक पाहिला(बघितला)दु:खाने भरलेला पाताळ पाहिला परंतू मला कोठेही मासभर ही सुख मिळाले नाही स्वर्ग लोकात दु:ख कसे?आदि सतगुरु सुखरामजी महाराज

सांगतात.।।३।।

देवलोक में ओ दु:ख व्यापे, एक एक सिर होई रे ।
निसदिन नाटक करे सिरउपर, देव देव सिर जोई रे लो ।

देवलोकात हे दु:ख असते की,हे एकाच्या वर एक(२१ स्वर्ग)खालच्या स्वर्गापेक्षा वरच्या स्वर्गात सुख जास्त मिळते आणि हे सुख तेथे पोहचलेल्या जीवाला बंधनकारक असते हे २१ स्वर्ग पारदर्शक आहेत याकारणाने खालच्या स्वर्गातून वरच्या स्वर्गात काय नाटक चालते हे सर्व दिसते असे हे स्वर्ग एकाच्या वर एक आहेत आता मृत्युलोकात कसे दु:ख आहे हे पाहू

मृत्यूलोक में ओ दु:ख भारी, मरता बार न लागे रे ।
इंद्रि सुख हुवे नहि पूरण, चाय बहोत घट जागे रे लो ।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मृत्युलोकात खूप भारी दु:ख आहे ते काय आहे तर आवागमनाचे म्हणजे जन्मण्याचे आणि मरणाचे जन्मण्याचे दु:ख कसे तर गर्भाचे दु:ख झेलावे लागते आणि जन्मल्यानंतर मरण्यास वेळ लागत नाही(क्षणभंगूर) आणि याच्या सोबत ५ इंद्रियांचे जे सुख आहे याच्याने हा हंस कधीही तृप्त होत नाही आणि या सुखांची चाहणा घटात खुप जागृत होते आता पाहू पाताळात कसे दु:ख आहे.

शेषलोक में ओ दुख व्यापे, भगत बिना नर काया रे ।
वां को बोझ पडे सिर वाके, नाग दुखी यु भाया रे लो ।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की या शेषलोकात म्हणजे पाताळ लोकात हे दुख आहें की,पृथ्वीवर जे मनुष्य त्या समर्थ साहेबाची भक्ती करीत नाही त्या मनुष्यांचा ओझे नागलोकावर पडतो म्हणजे तेथे जे जीव आहेत त्यांच्या शिरावर यांचे ओझे पडतो आणि हा ओझे त्या नागलोकात गेलेल्या जीवांना सहन करावा लागतो हे भारी दु:ख तेथे आहे या तऱ्हेने आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात मी स्वर्गलोक, मृत्यूलोक,पाताळलोक पाहिला,यांच्यात मासभर ही सुख नाही आहे म्हणजे जरासेही (थोडेसेही)सुख या लोकात नाही म्हणून हे समर्थ साई मला आपण आपल्या शरणात घ्या असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.

**मात पिता कुळ भाई र बंधु ।। स्वारथ का सब कोई हो ।।४।।**

मी त्रिगुणी मायारुपी माता,होणकाळ पारब्रम्ह पिता,माता पित्यापासून बनलेला तीन लोक चौदा भवनाचे कुळ,ब्रम्हा,विष्णु महादेव हे भाऊ बंधू बघितले हे सर्व स्वार्थाचे दिसले माझ्या पासून सुख चाहणारे दिसले मला आवागमनाच्या चक्रात ठेवून सुख घेणारे दिसले मला काळाच्या दु:खातून काढणारे कोणी ही दिसले नाही हे स्वार्थी कसे आहे?

''बेद जक्त स्वारथ ले गाया, तीन लोक का सुख बताया
जो आतम वुं भावे माई, सो बेदो में समझ बताई ।''

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हीच गोष्ट समजावण्या करीता एका संवादात सांगतात की,ब्रम्हाने जे चार वेद बनविले ते त्याने आपल्या स्वार्था करीता गायले आहेत चारी वेदात तेच ज्ञान आहे त्याच क्रिया करण्या आहेत तेच योग आहे त्याच विध्या आहेत ज्यांची पोहच ३ लोकापर्यंत आहे त्या विध्यांनी ३ लोकापर्यंतचेच फळ मिळते ब्रम्हाने वेदात जे ज्ञान सांगितले आहे ते हंसाच्या ५ आत्म्यांना भावेल(आवडेल)असेच सांगितले आहे याकारणाने जग वेदात लागते आणि ३ लोकातच राहते असे ३ लोकातच जीवांना राखणे आणि त्यांच्या वर राज्य करणे हा स्वार्थ घेवून ब्रम्हाने वेद गायले अशाप्रकारे विष्णुने आपला स्वार्थ चालवत नवविद्या भक्ती आणि शंकराने हठयोग आणि ६ शास्त्र जगाला सांगितले असे हेच शक्तीने आणि पारब्रम्हने आपले आपले ज्ञान आणि विध्या जगात उघडून उघडून सांगितली गुरु महाराज समजावतात की,आपण ज्यांचे ज्ञान,विध्या, भक्ती धारण करुन दु:खातून निघणे होईल परममोक्षात जाणे होईल असे तर हे बरोबर नाही आहे त्या विध्यांची आपण ३ लोकात काळाच्या मुखातच राहाल त्याच्या परे ज्या सुखांची चाहणा आहे ते मिळणार नाही अशा प्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हे सर्व माता,पिता,भाऊ,बंधू,कुळ सर्व आपले आपले स्वार्थ पूर्ण करतात म्हणून गुरु महाराज सांगतात मी खूप दु:खी याकारणाने हे प्रभू हे समर्थ साई मला आपल्या शरणात घ्यावे. ।।४।।

**ग्यान बिण मे सब जुग जोयो ।। गुरां बिन कांहुँ सुख नाही हो ।।५।।**

मी इच्छा माता तसेच पारब्रम्ह पिता यांनी होणकाळ जगात सांगितले सर्व ज्ञान पाहिले, शोधले आणि त्या ज्ञानानुसार सर्व साधना केली परंतू मला अवागमनातून सुटण्याचे सुख कोठे मिळाले नाही हे जन्म मरण्याचे काळाच्या चक्रातून सुटण्याचे सुख सतस्वरुपी गुरु शिवाय कोठे नाही आहे हे मला समजले आदि सतगुरु सुखरामजी महाराज एका जागी सांगतात.।।५।।

वेद भेद लग है बुध सबमें, पारब्रम्ह लग सोई ।
सतस्वरुप को कोई न जाने, ज्ञानी, ध्यानी लोई ।

मी वेद,भेद बधितले आणि वेद भेदाचे ज्ञानी ही पाहिले येथपर्यंत की सर्व मायेचे तसेच मायावी विध्यांची समज आहे,बुध्दी आहे येथपर्यंत की पारब्रम्ह पर्यंतच्या ज्ञानाची समज जगात आहे परंतू सतस्वरुपाची समज या ज्ञानी,ध्यानींमध्ये नाही हे सतस्वरुपाला कधीही जाणत नाही म्हणून हे समर्थ साई सतगुरु आपल्या शिवाय या संसारात कोठे ही सुख नाही आहे आणि आपली जी भक्ती सांगतात असे सतगुरुच या जगात खरे आहेत (सतस्वरुप–सतगुरु)म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज एका पदात सांगतात

''सतगुरा सा कोई सेण न देख्या, ना कोई इण सम दाता बे ।
तीन लोक फिर सब हम देख्या, गुरु बिन दोजख जाता बे ।।

सतगुरुच आम्हाला सतस्वरुप साईशी ओळख करवितात ज्ञान देतात आणि आमच्या घटात तो समर्थ साहेब प्रगट करण्याचा भेद देतात जेव्हा सतस्वरुप साई घटात प्रगट होवून जातो तेव्हा त्या हंसाचा काळ सुटून जातो म्हणून गुरु महाराज सांगतात या सतगुरु सारखे या ३ लोक १४ भवनात कोणी नाही कारण की,सतगुरु शिवाय ही गोष्ट घटात आणखी कोणी प्रगट करुन देत नाही आणि सतगुरुच्या शिवाय सर्व गर्भरुपी नरकात जात आहे म्हणून गुरु महाराज सांगतात की,मी हे समर्थ साई आपल्या ज्ञाना शिवाय पूर्ण संसार बधितला आपल्या शिवाय म्हणजेच सतस्वरुपी सतगुरुंच्या शिवाय या संसारात कोठे ही सुख नाही.

**के सुखराम सुणो गुरू सांई ।। तम बिन जीसुं नाही हो ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सतस्वरुप गुरु स्वामीजीला सांगतात की,हे गुरु साई, आपण माझे ऐका मी काळाच्या दु:खातून काढून महासुखात टाकणारे समर्थ फक्त आपणच आहात त्या काळाच्या पलीकडील महासुखात जाईल तेव्हाच मी जगू शकेल असे माझे काळाच्या दु:खातून काढून सतगुरु सोबत सुखाचे जीणे(जगणे)हे समर्थ गुरु सतगुरु सुखरामजी महाराज एका पदात सांगतात. ।।६।।

**जुग जुग जन की ये सहायज कीनी, भीड पडी तहां आया बे ।**
**सिंक्या जुग जुग आप पधारे, बिड्द वाका तु गाया बे ।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे समर्थ साई आपण जनाची म्हणजे संताची सहायता केली युगानुयुगात जेव्हा जेव्हा संतावर दु:ख पड्ले तेव्हा तेव्हा आपण आलात म्हणजे आपण त्यांचे दु:ख निवारण केले असे आपले ब्रिद दिनदयाल आपण पूर्ण केले ज्याने ज्याने आपले स्मरण केले तर आपण युगानुयुगात आले म्हणजे आपण ब्रिद पूर्ण केले आणि त्या जनाचे कारज पूर्ण केले आणि त्या संतांनी हे अविनाशी समर्थ,आपल्या ब्रिदची महिमा गायली तर हे स्वामी मी ही आपल्याच शरणात आहे आपल्या शरणा शिवाय मला आणखी दूसरे काही आवड्त नाही मी आता आपल्या शिवाय या संसारात जगू शकणार नाही तर हे स्वामी आपण मला आपल्या शरणात घेऊन घ्या.उदा.जसे पतीव्रता स्त्री आपल्या पतीची होऊन जाते तर तिची लाज राखणे तिच्या पतीचे ब्रिद बनून जाते तसेच हे स्वामी आपले हे ब्रिद आहे की आपल्या शरणात जो येतो त्याला आपण तारुण घेतात तर मी आता आपल्या शिवाय जगू शकणार नाही असा मी आपल्या शरणात आलो आहे.

२३५

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**मेरे मनकी दुबध्या मेटो प्रभुजी**

**तम हम मिलाँ अवस कर स्वॉमी ।। अेक अंग कर सेंठो ।।टेर।।**

सतगुरुकडून ज्ञान ऐकतो तर सतस्वरुप सत्य आहे व ब्रम्हा,विष्णू,महादेवचे ज्ञानी गुरुकडून ज्ञान ऐकतो तर माया सत्य आहे असे माझ्या मनाला लागत राहते या कारणाने मी कधी सतस्वरुप सत्य आहे तर कधी माया सत्य आहे असे दुविधेत दोन विचारात राहतो माझे मन काय सत्य आहे व काय खोटे आहे याच्यात स्थिर होत नाही हे स्वामी माझे मन सतस्वरुप सत्याशी एक करुन द्या पक्के करुन द्या मग काय सत्य आहे व काय खोटे आहे.या संकल्प विकल्प मध्ये जाऊ देवू नका.तेव्हा मला विना विलंब(उशिर न करता)आपल्यात भेटता येईल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।टेर।।

**लोंचो खाय डिगे पल माँही ।। सिकळ बिकळ होय जावे ।।**
**कबुयक राव रंक व्हे दाता ।। युं बोहोता दुख पावे ।।१।।**

हे माझे मन सुख दु:खाने उगमगून जाते कधी हे राजा बनण्यात सुख मानतो तरी कधी रंक बनल्याने दु:ख बघतो,कधी दाता बनून आनंद घेते तर कधी भिक्षा मागण्यास घाबरते तर कोठे सुख दिसते तर कोठे दु:ख दिसते असे सिकल विकल होवून जाते,अस्थिर होऊन जाते व अनेक दु:ख भोगतो. ।।१।।

**घंडि अेक कहे भगत म्हे कर सूं ।। पल खिण में छिटकावे ।।**
**नावो जाय गिरेमे रत्त रे ।। नासो भगत संभावे ।।२।।**

एका घडीत म्हणतो की सुख प्राप्त करण्याकरीता मी तुझी भक्ती करेल तर दुसऱ्या घडीत(क्षणात)मृगजळासारखे विषयरसाचे सुख पाहून भक्ती मानूनही सोडून देतो अशा प्रकारे हे माझे मन काळाच्या भीतीने गृहस्थीपणात रमत नाही व आपले तृप्त सुख समजत नाही म्हणून आपल्यातही रमत नाही. ।।२।।

**पलमें कहे जगत हे झूटी ।। भगत साच हे भाई ।।**
**खिणमे आण मिले सेंसारी ।। बिष जुग रहे समाई ।।३।।**

क्षणात म्हणतो ही संसाराची मोह ममता खोटी आहे व प्रभूची भक्ती सत्य आहे व दुसऱ्या क्षणात गृहस्थीपणाचे खोट्या विषय रसांना सत्य समजून यास रसांमध्ये रचमचून जातो. ।।३।।

**दुबध्या मांहे बहुत दुख पावे ।। नां ऊलो ना पेलो ।।**
**ज्यूं सुण पान बघुळे मुखमे ।। भटकर अधरती गेलो ।।४।।**

माझे मन विषयरस व सतस्वरुपाच्या भक्ती रसाचा फरक समजू शकत नाही,या कारणाने भक्ती रसात इकड्या राहत नाही ना तिकड्या राहतो व भक्ती रस व गृहस्थी रसाच्या दोन विचारात भटकून खूप दु:ख भोगतो जसे पान चक्रवातात चारी कडून फिरते किंवा प्रवाशी अर्ध्या रात्री रस्ता विसरुन चुकून गल्ली गल्लीत घर शोधत फिरतो असे

माझे मन आपणास प्राप्त करण्याकरीता दुविधेत भटकत असते. ।।४।।

**डिग पच करे हुवे मन पाछो ।। भगत न मेली जावे ।।**
**युं मन रात दिवस घट घोटे ।। ओ प्राणी ब्हो दुख पावे ।।५।।**

तुझ्या भक्तीत माझे मन लागत नाही माझ्या मनाने थोडे चालतो न चालतो तर मागे येऊन पडतो अशाप्रकारे माझ्या मनाने तुझी भक्ती पूर्ण केली जात नाही असे माझे मन रात्रदिवस कधी पुढे चालते व कधी मागे येवून पडते याकारणाने मी खूप दुःखी असतो. ।।५।।

**अरज करे सुखराम गुसांई ।। सुण साहिब हर रामा ।।**
**मे तो सरण तुमारी आयो ।। मोहे दिखावो निज धामा ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे गुसाई,हे साहेब,हे हर रामजी मी आपल्या शरणात आलो आहे माझी आपणास विंनती आहे की,आपण मला आपला परमसुखाचा निजधाम दाखवा.।।६।।

२४३

महासुखाच्या पदाला हरीचे पद म्हणतात सुखाच्या सोबत वेगवेगळ्या प्रकारच्या महादुःखाच्या पदाला काळाचे पद म्हणतात.

या जीवाला दोन पद कसे उपलब्ध आहेत ?सतस्वरुपात होणकाळ आहे आणि होणकाळात जीव आहे म्हणजे जीवा करीता दोन्ही पद उपलब्ध आहेत सतस्वरुपाच्या देशात जाण्या करीता हरीचा शरणा आणि स्मरण हवे आणि होणकाळाच्या देशात गुंतून राहण्याकरीता मायावी क्रियांची गरज असते जीवाला आदि स्थितीत सुख व दुःख दोन्ही नव्हते जीवाला नेहमी सुखाची चाहणा असते जीवाच्या समोर दोन्ही पद उपलब्ध आहे जीव हा ब्रम्ह आहे परंतु त्याच्या सोबत मन आणि ५ आत्मा ही माया आदि पासूनच आहे सतस्वरुप देशात ५ आत्मा आणि मन ही माया जाऊ शकत नाही ही माया ढकलल्याने ही जाऊ शकत नाही मनाला ५ आत्म्यांचे सुख हवे मनाला चेतन जीवाशिवाय सुख मिळू शकत नाही आदि स्थितीत(जीव जसा होता तशा स्थितीतही) जीवाला आणि मनाला दोघांना सुख नव्हते.मन जीवाला जखडून जुळला होता जीव मनाला आपल्या बळाने सोडवू शकत नाही म्हणून जीवाला मना सोबत राहावेच लागते मन ही माया आहे म्हणून(याकरीता)तो मायेतच सुखाची कल्पना करु शकतो कल्पनेच्या जोरावर मन जीवाला मायेच्या सुखात उचकवितो जीव मनाला स्वतःच्या बळावर सोडू शकत नाही याकरीता जीव मनाच्या घेऱ्यात येवून ५ तत्वाचा देह धारण करतो आणि सुखाकरीता मायेच्या क्रिया करतो.या मायावी क्रियांना कर्म म्हणतात ह्या क्रिया म्हणजे कर्म मनुष्य देहात केल्याने जीवाच्या सोबत मन आणि ५ आत्मा जशा जीवाला आदि

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

पासून चिकटल्या आहेत तसेच जीवाला हे कर्म ज्या विधीने केले त्या विधीने बदल्याच्या रुपाने दिले तरच खारीज(चुकविले)होतात म्हणजे दिले जातात.नाही तर जीवाच्या सोबत मन,५ आत्मा आणि तिसरे कर्म अशी नवी स्थिती बनलेली असते.

हे कर्म भोगविण्याचे कार्य(काम)काळाचे असते हा काळ जालिम आहे अपार दुःख देणारा आहे कर्म करतांना कितीही डोळे फाडून-फाडून शुभ कर्म केले तरीही अशुभ कर्म होतातच शुभ कर्माचे फळ सुख देणारे असते आणि अशुभ कर्माचे फळ दुःख देणारे आहे कर्म जोपर्यंत जीवासोबत आहे तोपर्यंत सुख आणि दुःख दोन्हीही बनलेले राहणार कारण कर्म शुभ आणि अशुभ कर्माचे मिश्रण आहे.कर्मापासून बनलेले दुःख जीवाला खूप वाईट तऱ्हेने सतावतात म्हणून जीव दुःखाचे मूळ कर्म आहे हे समजून स्वतःच्या बळाने कर्म मिटविण्याचा प्रयत्न करते म्हणजे कर्म मिटविण्याचा प्रयत्न करते.

कर्म तीन प्रकारचे असतात

१)संचित २) प्रारब्ध ३) क्रियेमान

नवे कर्म करतो त्याला क्रियेमान कर्म म्हणतात

ज्या कर्मांचा बदला दिला गेला नाही ते कर्म हंसाच्या सोबत जमा होवून जाातात म्हणून त्यांना संचित कर्म म्हणतात.

ज्या-ज्या देहात आम्ही जावू त्या देहाच्या सोबत बदला चूकविण्या करीता दिल्या गेलेल्या कर्माला प्रारब्ध कर्म म्हणतात.

असे जीवाचे संचित म्हणजे गोठोडीच्या रुपात प्रारब्ध कर्म भोगतांना तसेच मनाचे दुःख, तनाचे दुःख तसेच येऊन येऊन पडणाऱ्या दुःखा पेक्षा क्षणिक म्हणजे काही क्षण निघण्या करीता केलेल्या कर्म म्हणजे क्रियेमान कर्म अशा तीन कर्मांच्या चक्रात जीव जखडलेला आहे या कर्मांपासून सुटकारा नाही प्राप्त केला तर काळ दुःख भोगवत राहतो म्हणजे काळापासून सुटणे म्हणजे कर्मापासून सुटणे हाच एकमात्र मार्ग आहे हे जीव समझतो याकरीता जीवाने आपली कर्म कापण्याची अक्षमता(निर्बलता)प्रभूला सांगितली आणि प्रभूच्या संताकडून ऐकलेली कर्म कापण्याची विधि करण्याची चाहणा केली .

आदि सतगुरु सुखरामजी महाराज येथे परमात्म्याला सांगतात की,माझ्या बळाने कर्म कांपले जात नाही आदि सतगुरु सुखरामजी महाराज तर अमर लोकातून आलेले आहेत त्यांना तर कर्म लागत नाही तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज येथे असे का सांगत आहे?तर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना माहित आहे हा जीव ज्या महादुःखात पडला आहे त्याचे कारण आहे कर्म आणि हे हंसाच्या बळाने मिटू शकत नाही यांना जर मिटवायचे आहे तरी सतस्वरुप परमात्म्यांचा शरणा घ्यावा लागेल तेव्हा हे कर्म मिटू शकतात आणि हीच गोष्ट समजविण्याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी

स्वत:ला समोर ठेवून हे पद लिहिले आहे.

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**मो बळ कर्म न जावे प्रभुजी**

**मो बळ कर्म न जावे प्रभुजी ।। मो बळ कर्म न जावे ।।**

**आगे किया तके किण पारा ।। अब ही ब्हो होय आवे ।।टेर।।**

हे प्रभुजी,माझ्या बळाने कर्म मिटणार नाही हा वर्तमान देह प्राप्त करण्याच्या आधी मी अपार कर्म केले त्या कर्मांचा अंत(बदला देवून देवून ही)आला नाही आणि येतही नाही याच्या नंतर आता ही माझ्या हाताने खूपसे नवे-नवे कर्म होत आहे.।।टेर।।

**रग रग रूम रूम को खूनी ।। पग पग दावा मेरे ।।**

**बदला दियां कदे नही छूटूं ।। ज्हां तहां मुज कूं घेरे ।।१।।**

माझे रोम-रोम म्हणजे नाडी-नाडी तसेच रोम-रोम म्हणजे केसा-केसात केलेल्या कर्माचा खूनी आहे म्हणजे केलेल्या कर्माचा दोषी आहे या कर्मांचे दावे माझ्या पावला-पावलात आहेत म्हणजे क्षणो-क्षणी माझ्या सोबत आहे इतके अनगणित कर्म माझ्याने झाले आहेत ज्यांच्या-ज्यांच्या सोबत मी कर्म केले म्हणजे गुन्हे केले ते बदल्याच्या रुपात देणे इच्छू (चाहूँ)तरी ही कधी ही कर्मापासून मुक्त होवू शकणार नाही हे बदले मला जेथे तेथे तसेच जेव्हा तेव्हा घेरत असतात आणि मी त्या कर्मांनी घेरला असतो. (त्या कर्मांशी घेरलेला असतो)।।१।।

**करणी किया क्रम शिर बंधे ।। ध्रम पुन्न होय दावो ।।**

**तपस्या कियां तिर्था भटक्या ।। ब्हो बिध जीव सतावो ।।२।।**

कर्मांपासून बनलेले दु:ख मिटविण्याकरीता वेदांच्या शुभ शुभ करण्या केल्या तरी ही कर्म शिरावर बांधले जातात वेदांच्याही अनुसार धर्म व पुण्यकर्म केले तरीही पुढे धर्म व पुण्य कर्म भोगण्याकरीता शिरावर बांधले जातात तपस्या केली तरीही खूपसे जीव सतावाले(मरतात)जातात तपस्या करतात तेव्हा धूनी लावतात धूनीच्या अंगाऱ्याने खूपसे जीव सतावले जातात तिर्थ केले तर तिर्थात पाण्यात खूप प्रकाराने जीव सतावले(मारले) जातात धरतीचे खूपसे जीव चालता-चालता मरतात याकारणाने त्या जीवांचा बदला माझ्यावर दाव्याच्या रुपाने उभा राहतो.।।२।।

**जे म्हे जतन करूं ब्हो गाढो ।। आँख खोल नहि जोऊं ।।**

**तीन ताप का कर्म हमारा ।। संचत कुण बिध खोऊँ ।।३।।**

मी जर क्रियेमान कर्म होणारच नाही असे भरपूर(खूप)प्रयत्न करु आणि नव्या कर्मांकडे डोळे उघडे करुन ही बघणार नाही कारण की नवे कर्म माझ्याने होणारच नाही तर मोठा प्रश्न उभा राहतो की,तीन प्रकारचे कर्म माझ्या सोबत आहेत संचित,प्रारब्ध,क्रियेमान

प्रारब्ध भोगत आहे,क्रियेमान होऊ देणार नाही परंतु संचित कर्म कसे मिटवू?।।३।।

**जो जो ऊठ उपाय करीजे ।। जीव मरे सब माही ।।**
**जे मुक्त हुवे बदला दीया ।। तो सपने कदे न जाही ।।४।।**

या कर्मांचा बदला देण्याचे जे-जे मायेचे उपाय आहे ते मी करतो तर बदला देते वेळी जाणते न जाणते म्हणजे कळत-नकळत जीव मरतात जीव मेल्याने परत नवे बदले बनतात आधीचे बदले देण्यानेच जर मी कर्मापासून मुक्त होवू शकतो तरी मी स्वप्नातही मुक्त होवू शकत नाही म्हणजे कधीही मुक्त होवू शकत नाही.।।४।।

**क्हे सुखराम सरण हर तेरी ।। अेसी मोय बताई ।।**
**भजन किया सूं करम कटे सो ।। कटे पलक के माई ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सतस्वरुपी परमात्मा,माझी ही चिंता मी संतांना सांगितली .

ते संत कोणते -

ज्यांनी सतस्वरुप परमात्म्याचा शरणा घेतला आहे.ज्याच्यात सतस्वरुप नखापासून शिखापर्यंत प्रगट आहे.ज्यांचा सर्व कर्माचा नाश झाला आहे,

ज्यांचा हंस दहाव्याद्वारात विराजमान आहे अशा संतांना माझी चिंता सांगितली,तर संतांनी मला सांगितले की,प्रभूचा शरणा घेतल्याने आणि त्याचे भजन केल्याने सहजमध्ये म्हणजे समज न पडता पळात सर्व कर्म कापले जातात.शरणा कसा घ्यायचा-सतस्वरुपाचे बनून जावे भजन कसे करावे-जसे पतिव्रता स्त्री करते ती तोंडाने पती-पती करीत नाही तर आपल्या हंसाच्या उरातून त्याची बनून जाते तिला आपल्या पतीच्या शिवाय पूर्ण सृष्टीत दूसरा कोणता पुरुष दिसत नाही तेव्हा तिच्यात सत्त प्रगट होते.

असेच हंस आपल्या उरातून सतगुरु मध्ये जो सतस्वरुप प्रगट आहे त्या सतस्वरुप परमात्म्याचा होऊन जाईल.त्याच्यात लवलीन राहणे त्याच्या शिवाय सृष्टीत काही ही,न दिसायला हवे.तेव्हा हंसातच जो परमात्मा आहे तो प्रगट होऊन जातो आणि एकाच पळात सहजात पूर्वेचे ६ कमळ आणि पश्चिमेचे ६ कमळ छेदन करुन दहाव्याद्वारात पोहचून जातो.दहाव्याद्वारात पोहचताच सर्व कर्माचा नाश होतो.

पतीव्रता स्त्री सारखे ज्याने निजमन दिले त्याचे काम पळात बनून गेले मग ज्याला पतीव्रता स्त्री सारखे निजमन सतस्वरुपाला देता येत नाही तर त्यांनी भक्ती करु नये का?त्याला साई मिळणार नाही का?तर असे नाही आहे.

ज्याला ही विधी येऊन गेली त्याचे काम तर पळात होवून जाते परंतू ज्याची ही स्थिती बनत नाही त्याने त्याचे जसे बनता येते तसे बना म्हणजे जितके निजमन साहेबाला देता येते तितके द्यावे आणि येत्या-जात्या श्वासात रामनामाचे धारोधार

स्मरण करावे,भजन करावे(करा)(दीर्घ श्वास घ्या,२० शब्द आत घ्या)याच्याने त्रिगुणी मायेची विकारी स्थिती येईल.वैराग्य स्थिती झाली की घटात जो परमात्मा आहे,तो प्रगट होवून जाईल असे कर्म कापण्याची,साईला प्राप्त करण्याची स्थिती बनून जाईल.
कर्मांचा नाश कसा होतो?
जेव्हा हंस आपले निजमन सतस्वरुप साहेबाला देतो म्हणजे त्याचा बनून जातो त्याच वेळी त्याच्यात जो सतस्वरुप आहे तो प्रगट होतो.
जसेही सतस्वरुप घटात प्रगट होतो तसेच(तेव्हाच)काळाची सत्ता निघून जाते पूर्ण सत्ता दहाव्याद्वारात पोहचल्यावर निघते.हे सतस्वरुप म्हणजे ने:अक्षर या हंसाला घेऊन एक-एक कमळ छेद्न करतो जेव्हा हा नाभी कमळात येतो.तेव्हा याच्या सोबत ज्या ५ आत्मा असतात त्या निघून जातात पुढे जेव्हा तो त्रिगुटीत येतो तेव्हा त्याच्या सोबतचे मन सुटून जाते निराकारात ९ तत्त लिंग शरीर सुटते शिवब्रम्हच्या पुढे महाशुन्यात सुरत काया सुटते जसेही हा हंस दहाव्याद्वारात पोहचतो तेव्हा पासून त्याला क्रियेमान कर्म लागत नाही आणि अनंत जन्माचे संचित कर्म गळून जातात उरले पारब्ध कर्म ते ही भजन करीत राहीले तर शिथिल होवून जातात किंवा पूर्ण नष्ट होवून जातात प्रारब्ध कर्म कमी झाल्या कारणाने किंवा शिथिल झाल्या कारणाने हंसाला प्रारब्ध कर्माचे बदले देणे सहजता बनून जाते असे तो प्रारब्ध कर्म सहज भोगून घेतो हे सर्व कर्म नष्ट झाले की हंस काळापासून सुटून मुक्त होवून जातो. ।।५।।

२८१

।। पदराग बिहगडो ।।

**प्रभूजी मै काहा करूं इस मन को**

**सत्त लोक की बात न माने ।। सुख चावे इस तन को ।।टेर।।**

प्रभूजी,मी आता या मनाचे काय करु?माझे मन महासुखाच्या सत्त लोकात जाण्याची गोष्ट ऐकत नाही व शरीराच्या ५ इंद्रियांचे सुख जिद्द करुन घेवू इच्छीतो.।।टेर।।

**सुत बिन नार त्याग घर अपणो ।। दूर दिसन्तर जावे ।।**

**ज्याँ त्याँ जाय धरे शिर सेवग ।। दूणो हेत लगावे ।।१।।**

आपली पत्नी,पुत्र आणि धन सोडून साधू होतो व दूर देशान्तर जातो जेथे जातो तेथे तेथे आपले चेले बनवितो व त्यांच्याशी आपल्या पत्नी,पुत्रापेक्षा जास्त मोह ममता करतो व सत्तची गोष्ट तरी शोधत नाही. ।।१।।

**ग्यान ग्रंथ मैं बोहोत सुणाऊँ ।। प्रसंग दिष्टंग सोई ।।**

**ऊण बेळा में मन जे करले ।। वे तो पलटे पल में आई ।।२।।**

या मनाला मी सत्त ज्ञानाचे ग्रंथच्या ग्रंथ वाचून समजावतो.त्याला समजण्याकरीता जगात घडलेले अनेक प्रसंग दृष्टांत सांगतो ऐकतो तेव्हा त्याला समजतात परंतू मायेत

लागून गेला की पळभरात मायेचा बनून जातो. ।।२।।

जे मन घेर संत पे जाऊँ ।। ग्यान ज बोहोत सुणावे ।।
गुण सुण लाख सेस दस छाडे. ।। ओगण एक संभावे ।।३।।

जर मी मनाला घेरुन संताच्या दरबारात जातो व संताकडून मनाला ज्ञान ऐकवतो तर माझे मन त्या संतांचे लाखो गुण सोडून देतो संतामध्ये एखाद अवगुण असला तर त्याला पकडून घेतो. ।।३।।

मन कूं घोटर घर मे राखुं ।। राम राम मुख गावे ।।
छिन पल मांहि किदर होय भागे ।। जाय बिषे रस खावे ।।४।।

मनाला जबरदस्ती करुन घटात ठेवून तोंडाने राम राम करतो तर पळात(क्षणात)चिडून कोठेच्या कोठे पळून जातो व तेथे जाऊन विषयरस पितो. ।।४।।

के सुखराम सुणो हर दाता ।। ओ मन मो बस नाहीं ।।
मै तो सरण तुमारी आयो ।। प्रभू स्याय करो हो गुसाँई ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे मन माझ्या बस मध्ये नाही आहे मी आपल्या शरणात आलो आहे आपण प्रभू,गुसाई माझी सहायता करा व या मनाला माझ्या वश करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।५।।

२८२

।। पदराग गोडी ।।

प्रभूजी मेरे मन कूं हिम्मत दीजे ।।
जुग मरजाद तोड़ सब साँमी ।। सरण आपकी लीजे ।।टेर।।

प्रभूजी माझ्या मनाला हिम्मत द्या,हिम्मत द्या स्वामी माझ्या या मायेच्या जग मर्यादा राखण्याच्या स्वभावाला तोडून मला आपण आपल्या शरणात घ्या. ।।टेर।।

भजन करूं भगती में पेंसू ।। होय मतवाळो डोलूं ।।
जे हर आप करो हर किरपा ।। तो अणभे बायक बोलू ।।१।।

मी आपले भजन करतो भक्तीत बसतो व भक्तीच्या आनंदाने मदोन्मत होऊन डोलायला लागतो प्रभूजी मी आपल्या कृपेने माया मोहाच्या पलिकडील अणभय देशाचे शब्दही बोलतो. ।।१।।

ओ व्हे जाय कबु यक काचो ।। जब मुझ सझे न काई ।।
करम कीट हर भरम अंधेरो ।। मोहि पलोटे आई ।।२।।

परंतू माझ्यावर व माझ्या कुटूंबावर दु:ख पडल्यावर हे माझे मन कधी कधी भक्तीत कच्चे होवून जाते तेव्हा माझ्याने भक्ती होत नाही माझ्या कुटूंब परिवाराचे मोह ममतेचे कर्म व भ्रमाचे अज्ञान मला जखडून घेते. ।।२।।

दुख सुख मांय रखो मन अेकी ।। दूज्यो होण न पावे ।।

ज्यूँ ओ भगत करेगा तेरी ।। आठ पोहोर गुण गावे ।।३।।

माझे मन माझ्यावर कितीही दु:ख पडले तरी ही जसे माझे मन सुखात खुश राहते तसेच दु:खात ही खुश राहू द्या.माझ्या मनाला दु:खात दु:खी होवू देऊ नका असे झाल्यानेच मी तुझी भक्ती आठो प्रहर रात्रंदिवस करु शकेल. ।।३।।

के सुखराम अरज हर सुणियो ।। भगत बिड़द हर तेरा ।।
मै जुं सरण बोहोत सुख पाऊँ ।। प्रभूं बळवंत्त कर मन मेरा ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे रामजी माझी प्रार्थना(विनंती)ऐका रामजी भक्त बिड्द नाव आहे आपले भक्ताला दु:खातही बलवंत ठेवतो हे बिदड आहे आपले हे प्रभू माझे मन दु:खात बळवंत ठेवा दु:खी होवून दुबळे होवू देऊ नका.मी आपला शरणा घेतला आहे.मला सुखात ठेवून खूप भक्ती करु द्या ज्यामुळे मला आपले खूप सुख मिळतील. ।।४।।

२८३

।। पदराग बिहगडो ।।

प्रभुजी मेरी बाहाँ संभावो
मे खूनी अपत्ति तोई तेरो ।। कृपा कर घर आवो ।।टेर।।

प्रभूजी,आपण माझा हात पकडा मी खूनी आहे,पापी आहे तरीही आपला आहे म्हणून आपण माझे बनून माझ्या घरी यावे. ।।टेर।।

डरप्यो जीव करम सुण मेरो ।। ढयादि करे मन माही ।।
रूणके जीव मोख कूं साहिब ।। सुण हो आद गुसांई ।।१।।

माझे केलेल्या कर्मांचे पड्णारे भोग ऐकून मी खूप घाबरुन गेलो आहे.माझे मन कण्हून कण्हून राहिले आहे.हे माझे साहेब हे आदि गुसाई माझा जीव मोक्षा करीता झुरत आहे. ।।१।।

तलब लगी मेरे उर माही ।। थ्यावस साहेब दीजे ।।
दिल भर मो दिस जोय गुसांई ।। जन को कारज कीजे ।।२।।

माझ्या उरात मोक्षाची तलप लागली आहे साहेब मला धैर्य द्या आपल्या भक्तीत रमण्याची हिंमत द्या आपण आपल्या हृदयातून म्हणजे उराने(उरांतून)माझ्याकडे लक्ष द्या व माझे मोक्षाचे कार्य करा. ।।२।।

धिरज मेरे मन के नाही ।। निमक निमक ब्रेह आवे ।।
पल पल ब्याकुळ व्हे ओ प्राणी ।। जीव दसूं दिस जावे ।।३।।

माझ्या मनाला धिर नाही राहिला आहे पळापळात तुझ्यात मिळण्याचा(भेटण्याचा)विरह येऊन राहिला आहे माझे प्राण तुझ्याकरीता पळापळात व्याकूळ होऊन दाही दिशांमध्ये तुला शोधत आहे. ।।३।।

**बळ साहेब सतगुरू हरि दीजे ।। भांजो भ्रम अंधेरा ।।**
**मेरा क्रम काट कर काने ।। मेट चोरासी फेरा ।।४।।**

माझे सतगुरु,माझे साहेब,माझे हरी आपण मला मोक्ष प्राप्त करण्याचे बळ द्या आपण माझी त्रिगुणी मायेपासून मुक्ती प्राप्त करण्याची सत्ता समजण्याचा भ्रम अंधार तोडून द्या माझे चौऱ्यांशीत पडण्याचे कर्म कापून माझा चौऱ्यांशीचा फेरा मिटवून द्या. ।।४।।

**जीव बिचारो क्या कर सक्के ।। रेत रेण सो कोई ।।**
**के सुखराम आपकी कृपा ।। भक्त करूंगा सोई ।।५।।**

जीव बिचारा काय करु शकतो जसे राजाच्या राज्यात एखाद प्रजाच दु:ख निवारण्या करीता अति बेहाल,दु:खी झालेली असते,तिचे दु:ख ती स्वत:च्या बळावर दूर करु शकत नाही,असे अति बेहाल झालेल्या प्रजेला फक्त राजाच दु:खातून मुक्त करण्याचा आधार असतो असेच आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,हे प्रभू मी स्वत:च्या बळाने मोक्षाला जाण्या करीता अति दुर्बल आहे,म्हणून आपणच मला मोक्षाला पाठवा. ।।६।।

२८४
।। पदराग आसा ।।

**प्रभूजी मै किसका सरणाँ धारूं**
**भोळप माँहि किया गुरू च्यारी ।। को तज किस बिन सारूं ।।टेर।।**

प्रभूजी मी कोणाचा शरणा धारण करु मी भोळेपणात चार गुरु धारण केले आता मी कोणाचा शरणा धारण करुन ठेवू व कोणाचा शरणा त्यागू कृपा करुन माझी ही दुविधा मिटवून द्या. ।।टेर।।

**किरपा करे हमारे मॉहि ।। नॉव केवळ हरि आया ।।**
**ताँ पीछे गुरू भोळप माही ।। लालदास कूं गाया ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मला समंत १७९१ मध्ये हरीचे दर्शन झाले.ज्याच्याने माझ्या घटात कैवल्य नाव(नाम)प्रगट होवून गेले व ते नाम देहामध्ये पश्चिमच्या रस्त्याने पळू लागले माझ्या सर्व परिवाराचे गुरु मेलाणाचे लालदासजी दादुपंथी होते.या कारणाने मी देखिल भोळेपणात लालदासजींना गुरु धारण केले. ।।१।।

**बाणी कहुँ रीत बोहो भारी ।। सबद पिछम दिस धावे ।।**
**तब मै छाड़ लाल कू दीया ।। बूजा अर्थ न आवे ।।२।।**

हरीच्या रुपात प्राप्त केलेले केवली सतगुरुंच्या प्रतापाने कैवल्य शब्द माझ्या देहात मागच्या रस्त्याने पळू लागला व माझ्या भूखाने अमर लोकाची ज्याच्यात तीन लोकाच्या त्रिगुणी मायेचा जराही अंश नाही अशी भारी वाणी कुद्रती निघू लागली मी ह्या पश्चिमच्या रस्त्याने होणाऱ्या अनुभवाला समजून घेण्याकरीता गुरु लालदासजीच्या जवळ गेलो व

घटात होवून राहिलेल्या त्या अनुभवाच्या सर्व गोष्टी विचारु लागलो तर लालदासजी त्यावर थोडेही ज्ञान समज देवू शकत नव्हते उलट भ्रमात अटकवत होते म्हणून मी लालदासजी गुरुंचा त्याग केला. ।।२।।

**रामदास के दर्शण आया ।। पूजा टेल चढाई ।।**
**तब जन राम बूजणे लागा ।। को गुरू तेरा भाई ।।३।।**

पुढे मला बिरमदासजी महाराज गुरु मिळाले त्याच्यापासून मला निजपदाची समाधि लागून गेली ही निजपदाची ध्यानाची स्थिती पारखण्या करीता मी रामदासजींच्या दर्शनाला गेलो त्यांना टहल चढविली पूजा चढवल्यावर रामदासजींनी मला तुमचे गुरु कोण आहे हे विचारले.।।३।।

**तब मै कहयो गुरू हे बीरम ।। निजपद मोही बताया ।।**
**मेरे रीत बणी हे एसी ।। मे परखावण आया ।।४।।**

तेव्हा मी रामदासजींना सांगितले की माझे गुरु बिरमदासजी आहेत व त्यांच्या प्रतापाने माझ्यात निजपद प्रगट झाले.ही निजपदाची रित पारखण्याकरीता मी आपल्या जवळ आलो. ।।४।।

**जब जन रामदास जी बोल्या ।। रीत पकी हे थॉरी ।।**
**थाको भेव अग्या सुण लीया ।। बोहोत बणेगी भारी ।।५।।**

तेव्हा रामदासजी बोलले की,तुझ्या घटात प्रगट झालेली रित पक्की आहे परंतु येथील भेद व आज्ञा घेतल्याने तुझ्यात प्रगट झालेली निजपदाची रित आणखी ही भारी बनेल. ।।५।।

**बीरमदास यांही का चेरा ।। इशा भेद मुज दीया ।।**
**जब मे जाय सुण्यो भाई एसी ।। रामदास गुरू कीया ।।६।।**

बिरमदास येथील चेला आहे अशी गोष्ट रामदासजीने मला सांगितली.रामदासजीची ही गोष्ट ऐकून मी रामदासजीचा चेला बनून गेलो. ।।६।।

**बूजा बांत बीरमजी खीज्या ।। जाब मुज कू दीयो ।।**
**मुज कूं करे नीच को चेलो ।। दगो रामदास कीयो ।।७।।**

गुरु बिरमदासजी मिळाल्यावर मी गुरु बिरमदासजींना विचारले की आपण रामदासजीचे चेले आहेत ना तेव्हा बिरमदासजींनी सांगितले की मी रामदासजीचा चेला नाही आहे मी रामदासजीचा चेला आहे हे रामदासजी तुझ्या सोबत खोटे बोलले व कपट खेळून दगा करुन तुला शिष्य बनवून घेतले. ।।७।।

**च्यारी गुरू इसी बिध कीया ।। सुणो संत सब कोई ।।**
**अडवी पडी न्याव सब कीजे ।। सतगुरू कहो कुण होई ।।८।।**

अशाप्रकारे मी चार गुरु धारण केले म्हणून प्रभूजी व प्रभूजीचे सर्व संत चार गुरु करण्याची माझ्यावर ओढवलेली कहाणी आपण सर्व लक्ष देवून ऐका आता मी कोणाला गुरु समजावे व कोणाला गुरु समजू नये हे माझ्या समज मध्ये येत नाही म्हणून आपण सर्व माझ्या या अड्वी समजला ज्ञानाने न्याय करुन माझे खरे सतगुरु कोण कोण आहे हे मला सांगा. ।।८।।

**मेरे बस कछु अब नाही ।। बांत गई हे फेली ।।**
**हरजन साध संत सुण सायब ।। राम करे सो व्हेली ।।९।।**

चार चार गुरु केल्याने माझे निजपदाचे भेदी सतगुरु कोण आहे ही गोष्ट समजणे माझ्या हातातून निघून गेली आहे म्हणून आपण सर्व हरिजन केवली साधू संत व रामजी साहेब आपण जो न्याय कराल तो माझ्यासाठी(माझ्याकरीता)सिरताज आहे. ।।९।।

**मै मत्त हीण बुध्द सुण ओछी ।। अकल नही तन माँही ।।**
**के सुखराम रखे जा रूँला ।। सुण हो आद गुसांई ।।१०।।**

मी मतहीन आहे माझी बुध्दी ओछी(छोटी)आहे माझ्या तनात हे समजण्याची अक्कल नाही म्हणून आद गुसाई आपणच माझा न्याय करा व आपण मला जो गुरु सांगाल त्यांच्या शरणात राहिल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी रामजीला व सर्व केवल ज्ञानी संतांना स्वत: चीर सच्चाई समजण्याकरीता विनम्रतेने विचारले. ।।१०।।

३२७

।। पदराग बिहगडो ।।

**समरथ मे तेरा सरणा लीया**
**ग्यान सुण्यो हे गुरां के मुख सूं ।। तब मेरा मन बिया ।।टेर।।**

हे समरथ,जेव्हा मी सतगुरुंच्या मुखाने काळाचे भयंकर जुलूम(त्रास)ऐकले तेव्हा माझे मन काळाच्या दु:खांनी घाबरले व आपण शरणा घेऊ इच्छीले म्हणून मी आपला शरणा घेतला.।।टेर।।

**किरपा करे हरि मेरे आवो ।। सुण हो आद गुसांई ।।**
**खबर करो हरि मो आपत्ती की ।। द्रसण दो उर माही ।।१।।**

याकरीता कृपा करुन हरी आद गुसाई माझ्यात प्रगटा हे रामजी,तुम्ही माझे काळाचे दु:ख समजा मी काळाच्या आपत्तीत फसलो आहे म्हणून आपण माझ्या हृदयात दर्शन देऊन मला काळापासून सोड्वा. ।।१।।

**घणी अरज हरि कहाँ लग कर सूं ।। नेक ब्होत कर मानो ।।**
**चीत कर आप छेक जम लेखा ।। मो कूं चाकर जाणो ।।२।।**

हे रामजी,मला आपली प्रार्थना(विनंती)करता येत नाही जशी जितकी थोडीफार प्रार्थना करता आली त्याला अधिक(जास्त)समजून मला आपला चाकर मानून घ्या व आठवण

करुन माझे यमाचे पाप पूण्याचे सर्व हिशोब फाडून द्या. ।।२।।

जेसा बिड़द तुमारा कहिये ।। नाव बखाणज होई ।।
मेरा लछ कूं लछ मा देखो ।। राम बिड़द दिस जोई ।।३।।

आपल्या नामाची व ब्रीदची तिन्ही लोकात महिमा आहे म्हणून(याकरीता)रामजी माझे वाईट लक्षण न बघता तुमचे तारण्याचे ब्रिद बघा. ।।३।।

टाबर सदा कुं टाबर होवें ।। बाप बिरच नही जावे ।।
के सुखराम सुणो मेरा ठाकुर ।। अे तेरा बिड़द कहावे ।।४।।

मुल तर नेहमी मुलच असतात मुल कशाही हरकती करीत असले तरी ही बाप मुलांना सोडून देत नाही आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की माझे ठाकूर पित्यापेक्षा ही आपले बिड्द मोठे आहे असे सर्व सांगतात. ।।४।।

३८६

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

सुणज्यो अर्ज हमारी प्रभुजी

सुणज्यो अर्ज हमारी प्रभुजी ।। सुणज्यो अर्ज हमारी ।।
जे तन खून गुन्हा सब बगसो ।। राखो श्रण तुमारी ।।टेर।।

प्रभूजी मी आपल्याशी केलेले गुन्हे माफ करुन द्या व आपण मला आपल्या शरणात घेऊन घ्या ही माझी प्रार्थना ऐकून घ्या. ।।टेर।।

तुम प्रतपाळ उधारण स्वामी ।। में हूं क्रम बिलासी ।।
अब तो श्रण तुमारी आयो ।। काटो जम की फासी ।।१।।

आपण माझा उध्दार करणारे स्वामी आहात मी विषय वासनांचा कर्म विलासी आहे आता मी आपल्या शरणात येऊन गेलो आहे याकरीता आपण माझी यमाची फासी कापा. ।।१।।

मे तुज बिड़द इसो हर सुणियो ।। अजामेळ सा ताऱ्या ।।
गिनका तिरी बिकारां माही ।। गजका फंद निवाऱ्या ।।२।।

तुम्ही अजामेल सारखा पापी,विकारात बुडालेली वेश्या,तुला न जाणणारी पशु हात्ती इत्यादी प्राण्यांना तारले हे तुझे पापींना तारण्याचे बिड्द मी ऐकले म्हणून मी तुझ्या शरणात आलो. ।।२।।

मे तुछ जीव बुद बुद्यो सांई ।। क्या कर्णी ओ करसी ।।
जब हर आप करोला कृपा ।। तबे अवस ओ तीरसी ।।३।।

मी तुच्छ जीव आहे बिना बुध्दीचा जीव आहे मी तिरण्याची काय करणी करु शकतो. जेव्हा हरी आपणच कृपा कराल तेव्हाच निश्चित रुपाने मी तिरु शकेल मी माझ्या करणीने कधीही तिरु शकणार नाही. ।।३।।

तुम तारो जब स्मरथ सांई ।। क्हो कुण राखण हारा ।।

चवदा भवन लोक मिल तीनूं ।। सब ले आप पसारा ।।४।।

आपण समर्थ साई जेव्हा मला ताराल तेव्हा तुम्हाला मला तारण्यास कोण मना करेल तीन लोक चौदा भवनाचे सर्व देवी,देवता,अवतार स्त्री-पुरुष आपणच पसारा केला आहे तर यांच्यातील मला तारण्यास कोण मनाई करेल?।।४।।

ग्यान ध्यान क्रणी अर क्रिया ।। मोपे सझे न काई ।।

के सुखराम मिल्यां धर माही ।। किया करम नही जाई ।।५।।

साई माझ्याने मायेचे ज्ञान,ध्यान,करण्या,क्रिया(होत नाही)साधल्या जात नाही माझे केलेले पाप कर्म मी धरतीत जाऊन प्राण ही त्यागले तरी ही मिटणारे नाही म्हणून मी माझ्या कोणत्याही बलाने तिरु शकत नाही हे मी समजतो. ।।५।।

४०४

।। पदराग कानडा ।।

तुम बिन आन ओर नही धारूं

तुम बिन आन ओर नही धारूं ।। तन मन जीत पचीसुं मारूं ।।टेर।।

हे(अहो)साहेब मी आपल्या शिवाय आणखी कोणाचा शरणा धारण नाही करणार कृपा झाली तरी मी माझे विकारी मन माझ्या पाच विकारी आत्मा पंचविस विकारी प्रकृत्या यांना मारु शकेल. ।।टेर।।

नित उठ तोय पुकारूं सांई ।। मिल साहेब हर अंतर मांई ।।१।।

म्हणून हे साहेब आपण माझ्या आत मिळा ही माझी आपणास नित्य म्हणजे प्रत्येक क्षणी(प्रत्येक पळात)पुकार आहे. ।।१।।

मेरे नित चोट सबद की लागे ।। तूम मिलियां बिन करक ना भागे ।।२।।

मला आपले शब्द म्हणजे सतज्ञानाची आपल्या भेटीची(मिलनाची)नेहमी चोट लागते ते मिळाल्या शिवाय माझे हे दु:ख कधी ही जाणार नाही. ।।२।।

केहे सुखराम यो जनम अकाजा ।। जब लग अव गत परसुं न राजा ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो पर्यंत मी आपणास घटात प्राप्त करीत नाही तो पर्यंत माझा मनुष्य जन्म व्यर्थ जावून राहिला आहे(व्यर्थ जात आहे). ।।३।।